गुरुवार, 08 सप्टेंबर 2022
किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 02 अंक - 39
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • THURSDAY 08 SEPTEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-39 • TITLE CODE : MAHMAR51117 • PAGE-10 • PRICE-5

# धनुष्यबाण कोणाचा ? तारीख पे तारीख

## शिवसेनेच्या चिन्हावर पाच सदस्यीय घटनापीठासमोर झाली सुनावणी

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : 'निवडणूक चिन्हासंदर्भात केंद्रीय निवडणूक आयोगासमोरील सुनावणीला स्थगिती देऊ नये', असा अर्ज मंगळवारी (६ सप्टेंबर) शिंदे गटाने सर्वोच्च न्यायालयात दाखल केला. त्यावर, आज (७ सप्टेंबर) न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील पाच सदस्यीय घटनापीठासमोर तातडीने सुनावणी घेण्यात आली. या घटनापीठाने या प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलली आहे. यावर आता २७ सप्टेंबरला सुनावणी होऊन निर्णय येणार आहे.**

निवडणूक आयोगाने शिवसेनेच्या पक्षचिन्हाबाबत निर्णय न घेण्याचे लेखी आदेश दिले आहेत का अशी विचारणा घटनापीठाने सुनावणीत केली. याशिवाय दोन्ही पक्षांची बाजू समजून घेतली. यानंतर घटनापीठाने २७ सप्टेंबरला या प्रकरणी दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकून निर्णय देऊ, असं स्पष्ट केलं. तसेच निवडणूक आयोगाला २७ सप्टेंबरपर्यंत या प्रकरणात कोणताही निर्णय घेऊ नये, असे निर्देश दिले.

दरम्यान, याआधी शिंदे गटाने शिवसेना पक्षावर आणि पक्षाचं निवडणूक चिन्ह धनुष्यबाणावर आपला हक्क असल्याचा दावा करत निवडणूक आयोगाकडे त्यासाठी अर्ज केला होता. याला ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान देत या प्रकरणी निवडणूक आयोगाला निर्णय घेण्यापासून रोखावं अशी मागणी केली होती. या सुनावणीनंतर आता निवडणूक आयोग या प्रकरणात निर्णय घेऊ शकणार की नाही हे २७ सप्टेंबरलाच स्पष्ट होणार आहे.

शिंद गटातील १६ आमदारांच्या अपात्रतेपासून निवडणूक आयोगाच्या सुनावणीपर्यंत अनेक मुद्द्यांवरील सुनावणी सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. राज्यातील सत्तासंघर्षांसंदर्भातील अखेरची सुनावणी २३ ऑगस्ट रोजी झाली होती. निवृत्त सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा यांनी या प्रकरणावर सखोल युक्तिवादासाठी पाच सदस्यीय घटनापीठ स्थापन करण्याचा निर्णय दिला होता. मात्र, प्रत्यक्षात घटनापीठ अस्तित्त्वात यायला बराच उशीर झाला. शिंदे गटाच्या अर्जानंतर वेगाने हालचाली झाल्या. सरन्यायाधीश लळित यांच्यासमोर घटनापीठ स्थापन करण्यासंदर्भातील महत्त्वाचा निर्णय झाला.

शिंदे गटाने मंगळवारी केलेला अर्ज दाखल करून घेताना लळित यांनी, 'निवडणूक आयोगाच्या सुनावणीबाबत लगेचच काही भाष्य करता येणार नाही. पण, बुधवापर्यंत निर्णय घेतला जाईल', असे स्पष्ट केले होते. त्यामुळे निवडणूक आयोगापुढील सुनावणी सुरू राहणार की नाही, यावर न्यायालय आदेश देण्याची शक्यता आहे. निवडणूक आयोगाची सुनावणी कायम राहिली तर शिवसेनेच्या निवडणूक चिन्हावरील हक्काचा निर्णय न्यायालयाऐवजी आयोगाच्या कक्षेत होऊ शकेल.

निवडणूक आयोगाने शिंदे गट आणि शिवसेनेच्या उद्धव गटाला कागदपत्रे सादर करण्यास सांगितले होते. यासंदर्भात आयोगाने शिवसेनेला २३ सप्टेंबपर्यंत मुदत दिली आहे. शिंदे गटाच्या आमदारांच्या अपात्रतेचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असले तरी, 'मूळ शिवसेना आमचीच' असल्याचा दावा करत शिंदे गटाने 'धनुष्यबाण' या शिवसेनेच्या निवडणूक चिन्हावर हक्क सांगितला आहे. त्यासाठी त्यांनी निवडणूक आयोगाकडे अर्जही केला आहे. पण, निवडणूक आयोगाने कोणताही निर्णय देऊ नये, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते.

### महानगरपालिका निवडणुकांसाठी धडपड

मुंबईसह अन्य महापालिकांच्या निवडणुकीत विजय मिळवून शिवसेनेला शह देण्याचे शिंदे गट- भाजप युती सरकारचे लक्ष्य आहे. मुंबई महापालिकेची निवडणूक नोव्हेंबर महिन्यात होण्याची शक्यता असल्याचा मुद्दा शिंदे गटाने न्यायालयापुढील अर्जात उपस्थित केला आहे. शिवाय, अंधेरी पूर्व या विधानसभा मतदारसंघात शिवसेनेचे आमदार रमेश लटके यांच्या निधनामुळे या मतदारसंघात पोटनिवडणूक होणार आहे. पालिका व पोटनिवडणूक लढवण्यासाठी निवडणूक चिन्ह महत्त्वाचे असल्याने याबाबत तातडीने निकाल लागणे गरजेचे असल्याचे अर्जात नमूद करण्यात आले आहे. शिवसेनेवरील दावेदारीचे प्रकरण प्रलंबित असल्याने राज्यातील पालिका निवडणुकांमध्ये निवडणूक चिन्हासंदर्भात पेच निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शिंदे गटाने सर्वोच्च न्यायालयात अर्ज करून निवडणूक आयागोसमोरील सुनावणीला स्थगिती न देण्याची विनंती केली आहे.

# तृणमूल सीबीआयच्या रडारवर

आधुनिक केसरी न्यूज

**कोलकाता :** केंद्रीय अन्वेषण ब्युरोने (सीबीआय) कथित कोळसा घोटाळा प्रकरणात तृणमूल काँग्रेसचे नेते आणि कायदा मंत्री मलय घटक यांच्या निवासस्थानासह त्यांच्याशी संबंधित इतर ठिकाणांवर छापेमारी केली आहे. पश्चिम बंगालमधील कोलकात्यात चार ठिकाणी तर आसनसोलमधील एका ठिकाणावर ही कारवाई करण्यात आली आहे. कोळसा घोटाळाप्रकरणी २० सप्टेंबर २०१२ रोजी सीबीआयकडून खटला दाखल करण्यात आला होता. भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यानुसार सीबीआयने 'ग्रेस' या कंपनीचे संचालक मुकेश गुप्ता यांच्याविरोधात २८ ऑक्टोबर २०१४ मध्ये आरोपपत्र दाखल केले होते. याच प्रकरणात आता मलय घटक सध्या सीबीआयच्या रडारवर आहेत.

# द्वेषाचे राजकारण : देश गमावण्यासाठी तयार नाही : राहुल

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** काँग्रेसच्या 'भारत जोडो' यात्रेच्या आधी राहुल गांधी यांनी भावनिक संदेश दिला असून, द्वेषाच्या राजकारणामुळे आपण आपल्या वडिलांना गमावलं आहे, पण आपला देश गमावण्यासाठी तयार नाही असं म्हटलं आहे. कन्याकुमारी येथून काँग्रेसच्या 'भारत जोडो' भव्य यात्रेला सुरुवात होणार असून, राहुल गांधींनी त्याआधी तामिळनाडूमध्ये श्रीपेरुंबदुर येथील वडिलांच्या स्मृतीस्थळाला भेट देत अभिवादन केलं.

श्रीपेरुंबदुर येथेच २१ मे १९९१ मध्ये राजीव गांधी यांची हत्या करण्यात आली होती.



"द्वेष आणि फाळणीच्या राजकारणामुळे मी माझ्या वडिलांना गमावलं आहे. पण यासाठी आपला देश गमावणार नाही. प्रेम द्वेषावर विजय मिळवेल. आशा भीतीवर मात करेल. एकत्र येऊन आपण सर्वजण यावर मात करु," असं ट्वीट राहुल गांधी यांनी वडिलांच्या स्मृतीस्थळावरील फोटो शेअर करत केलं आहे. स्मृतीस्थळाला भेट दिल्यानंतर राहुल गांधी कन्याकुमारीसाठी रवाना झाले आहे. या ठिकाणी मुख्यमंत्री एम के स्टॅलिन यात्रा सुरु करण्यासाठी त्यांच्याकडे तिरंगा सोपवणार आहेत. देशातील आतापर्यंतची ही सर्वात मोठी यात्रा असेल असं काँग्रेसने सांगितलं आहे. संध्याकाळी ५ वाजता यात्रेचा शुभारंभ होणार आहे.

# दक्ष राजाने स्थापलेला नवसाला पावणारा संस्थान गणपती

आधुनिक केसरी न्यूज

गुलाब वाघ

गंगापूर : गंगापूर तालुका तसा पाहिला तर प्राचीन व पुरातन देवीदेवतांची मंदिरे व संतांची पावनभूमी असलेला तालुका आहे. या तालुक्यातून हिंदू धार्मियांची श्रद्धा व पवित्र असलेली गंगामाई अर्थात गोदावरी नदीही वाहते याच गोदावरीच्या तिरावर प्रभू श्रीरामाचा पदस्पर्श झालेला असून प्रभू श्रीरामाने नेवरगाव येथे संकटेश्वर व कायगाव याठिकाणी रामेश्वर शिवलिंग स्थापन केले आहे तर गंगापूर/वैजापूर तालुक्याची जीवनदायीनी असलेली शिवनामाईच्या तिरावर दक्षराजांची नगरीं लासूरगाव आहे या लासूरगावला देवी दाक्षायनीचे भव्य असे मंदिर आहे. याचठिकाणी दक्ष राजाने भव्य असा महायज्ञ करावयाचे ठरवले होते त्यामुळे संकल्पलेला यज्ञ निर्विघ्न्यपणे पार पडावा वं यज्ञाचे रक्षण व्हावे म्हणुन यज्ञभूमीच्या श्रीगणेशाची आराधना करून लासूरगावकडे येणाऱ्या चारी दिशेच्या चार रस्त्यावर श्रीगणेशाच्या मूर्तीची स्थापना केली त्यापैकी जळगाव रस्त्याला एक,देवी दाक्षयानी मंदिरात शिवना नदीकडे तोंड करून पूर्व दिशेला एक,देवगाव/वैरागड रोडवरील सोपानराव चव्हाण यांच्या मळ्यात एक, व आताचे लासूर स्टेशन येथे असलेला संस्थान गणपती हे दक्ष राजाने स्थापलेले गणेश मूर्ती आहे यापैकी लासूर स्टेशन येथील नवसाला पावणाऱ्या संस्थान गणपतीच्या मंदिराचा जीर्णोउद्धार गावाकऱ्यांनी केला आहे.

पूर्वी एका चौथऱ्यावर कच्चे बांधकाम वं गोलाकार घुमट असलेल्या छोट्या मंदिरात श्री गणेश मूर्ती अनेक दशकापासून विराजमान होती पण असे सांगतिले जाते कीं त्याहीपूर्वी तिथे चांगले मंदिर असू शकते मात्र निजामशाही व यावणीच्या कालखंडात या मंदिराची रया झाल्याची शक्यता आहे मात्र निजामशाहीच्या काळात वैजापूरवरून




छावणी तत्कालीन खडकी वं सध्याच्या औरंगाबाद शहराकडे जाणारा मुख्यरस्ता या मंदिरापासून जात त्याकाळी रात्री वैजापूर येथून सामानासह निघालेल्या कित्येक बैलगाड्या पहाटेच्या सुमारास याच गणेश मंदिराजवळून येत जात असत. व्यापारी मंडळी व त्यांच्यासोबतचे लोक याच गणपतीचे दर्शन घेऊन मंदिरासमोर असणाऱ्या दगडी रांजनात पैसे व इतर द्रव्य अर्पण करून बैलांना व माणसांना थोडी विश्रांती मिळाल्यावर पुढे मार्गस्थ होत असत, वैजापूरच्या एका व्यापाऱ्याने पैसे व द्रव्याच्या लोभाने गणपती बाप्पाच्या समोरील दगडी रांजनातून भाविकांनी अर्पण केलेले सोने, पैसे, द्रव्य व इतर मौल्यवान वस्तू चोरून नेले मात्र जागृत गणपती असल्याने सदर व्यापारी घरादारासकट दरिद्री झाला त्याच्यानंतर त्याच्या वारसानी त्या प्रकाराचा यथायोग्य प्रायश्चित घेतले व ते कुटुंबिय सध्या सुस्थितीत आहे.

दरम्यान संस्थान गणपतीची मूर्ती सात फूट सात इंच रुंदीच्या भक्कम, कोरीव दगडी चौथऱ्यावर नाग कोरलेले असून श्री गणेशाच्या भव्य मूर्तीची रुंदी चार फूट आठ इंच असून मंदिराचे गर्भगृह अठरा बाय अठरा फूट एवढ्या क्षेत्राफळाचे असून कळसाची उंची एक्केचाळीस फूट आहे. मंदिराचे पुनरनिर्माण करताना गणरायाची मूर्ती सात फूट उंच उचलणे आवश्यक होते यासाठी एक क्रेन आणले होते मात्र महाकाय मूर्तीचे वजन न पेलावल्याने क्रेन तुटली होती. शेवटी आणखी एक क्रेन आणून मूर्ती सध्याच्या उंच वं भक्कम चौथऱ्यावर गावकऱ्यांच्या विराजमान केली गेली असून येथेच ओंकारेश्वर येथून शिवलिंग, जयपूर येथून श्रीराम वं पंचायतन, दत्त भगवान, गोपाळकृष्ण, बालाजी परिवाराच्या मूर्ती तिरुपती येथून तर विठ्ठल रखुमाईच्या देखण्या मुर्त्या पंढरपूर येथून घडवून आणल्या व त्यां सर्व मुर्त्यांच्या प्रतिष्ठापना करण्यात आल्या. तेंव्हापासून मंदिरात रामदास महाराज मिश्रा, गोविंद महाराज त्रिवेदी हे पुजारी गणेशाची सेवा करत असून त्यांना ग्रामउपाध्ये जोशी, अनंत गुरु, केदारगुरु जोशी यांची मोलाची साथ वेळोवेळी लाभते व चार कर्मचारीही आहेत त्यामुळे दररोज सकाळी साडेपाच वाजता मंदिर उघडण्यात येते व पूजा/अर्चा करून सामुदायिक आरती अखंडितपणे अविरत चालू आहे. सकाळी अकराला सर्व देवांना स्वयंपाक करून सर्व देवी देवताना नैवद्य अर्पण केला जातो. दुपारी बारा ते चार वाजेपर्यंत मंदिर बंद असते व नंतर पुन्हा खुले केले जाते. दर गणेश चतुर्थीला गणपती बाप्पाचा गावात वाजत-गाजत छबीना निघतो. मंदिराच्या परिसरात श्री गणेश मंदिर संस्थांनाच्या विश्वस्त मंडळ व बालाजी भक्त आरती मंडळाच्या वतीने भाविकांच्या सहकार्याने अनेक विकासकामे प्रगतीपथावर असून यात मोठे सर्वसोयीनियुक्त भक्तनिवास, सभागृह, वाचनालय, ध्यान केंद्र व इतर सोयीसुविधा निर्माण करण्याचे काम विविध लोकप्रतिनिधीच्या सहकार्याने प्रगतीपथावर आहे.

दरम्यान बालाजी भक्त आरती मंडळाकडून गेल्या अनेक वर्षांपासून संस्थान गणपती मंदिरात गणपती उत्सवात गणरायाची मूर्तीची स्थापना केली जाते व अनंतचतुर्थी पर्यंत सकाळ/संध्याकाळ मान्यवरांच्या शुभहस्ते महाआरती केली जाते.

**लासूर स्टेशन येथील संस्थान गणपती हा नवसाला पावणारा असून अनेक भाविकाचे नवस पूर्ण झाले असून त्यां भाविकानी नवस व मनोकामना पूर्ण झाल्यावर नवस फेडलेले आहेत नवसाला पावणारा गणपती बाप्पा असल्याने अनेक भाविक बारा महिने याठिकाणी येऊन नवस बोलतात बोललेले अनेक नवस पूर्ण झाल्यचेही भाविक सांगतात. काही भाविकांना गणपत्ती बापाच्या आशीर्वादाने कित्येक कुटुंबियाना संतान प्राप्त झाली तर कित्येक व्यापाऱ्याना व्यवसायात भरभराटी झाली. कित्येकांचे तुटलेले संसार बाप्पाच्या आशीर्वादाने सुरळीत झाले. असे एक ना अनेक नवस बोलल्यावर पूर्ण झाल्याचे भाविक सांगतात. त्यासाठी श्रद्धा आवश्यक असून याठिकाणी अंधश्रद्धेला अजिबात थारा नसल्याचेही भाविक सांगतात. तर लासूर स्टेशन शहरात कोणीही जर संपत्ती, द्रव्य किंवा अत्याचार याचा अति गैरवापर केला तर संस्थान गणपती बाप्पा त्याला लयास लावतात, असा चमत्कार असल्याचेही जुने जाणते वयोवृद्ध जेष्ठ नागरिक स्वअनुभव सांगतात.**




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# शाश्वत शिक्षणाची गंगोत्री...

आधुनिक केसरी

मुलं शाळेत आहेत. त्यांच्या निरागस चेहेऱ्यावर आनंद फुलला आहे. त्यामुळे ती जास्तच सुंदर दिसतात. आणि मी अविश्वसनीय नजरेने त्यांच्याकडे पाहतो आहे.असा अनुभव मला एका शाळेतील मुलं पाहताना आला. खरं तर बालपण आणि निरागसता, बालपण आणि निखळ आनंद, बालपण आणि सौंदर्य या गोष्टी तशा जोडीनेच असतात. पण अलीकडे त्या तशा दिसतीलच, तशा रूपात भेटतीलच याची खात्री देता येत नाही. कारण आजच्या शाळांनी, शिक्षकांनी, पालकांनी आणि अभ्यासक्रमाने मुळातच रम्य असणारे हे बालपण करपून टाकले आहे. हेतुपूर्वक नसेलही कदाचित . पण तसे घडते आहे एवढे मात्र खरे.

पण या सगळ्या गोष्टींना अपवाद असणारी शाळा मला भेटली. या शाळेतील मुलांचे चेहरे जणू आनंदाने फुलले होते. एखाद्या उद्यानात बागडावे तशी ती मुले शाळेत हिंडत फिरत होती. कसला आनंद झाला होता त्यांना ? काही विशेष घडले होते का ? तसे काहीही झालेले नव्हते. त्यांचे चेहरेच त्या शाळेत कायम आनंदी होते. तो आनंद आतूनच फुलून आला होता. एखादे फूल पूर्ण उमलल्यानंतर जसे सुंदर दिसते, तसे त्यांचे चेहरे दिसत होते. आपली मुले शाळेत जायला नाखूष असतात. गेले तरी शाळा केव्हा सुटते असे त्यांना होते. शाळा सुटण्याचा कोण आनंद असतो..! जणू तुरुंगातून सुटलेले कैदीच ! पण याला अपवाद ही शाळा होती. इथे या शाळेत मुलांना सुटी नको असते. शाळेतच त्यांना राहायचे असते. शाळा सुटली तरी त्यांना त्याचा विशेष आनंद नसतो. ही शाळा आहे शाश्वत स्कूल. अमरावतीला रहाटगाव रोडवर. या शाळेत इतर शाळांसारखे ठराविक वेळापत्रक नाही, ठराविक तासिका नाहीत. वर्ग आहेत, तासही होतात. पण ही शाळा विद्यार्थ्यांना शिकण्याची संधी देते. येथील शिक्षक नेहमीच्या पद्धतीने हातात पुस्तक घेऊन शिकवताना, अभ्यासक्रम पूर्ण करताना दिसत नाहीत. ते मुलांना स्वयं अध्ययनाची संधी देतात. त्यांचे अध्ययन अधिक प्रभावी आणि स्वावलंबी कसे होईल हे पाहतात.

शाळेचा परिसर मोठा रमणीय आहे. निसर्गसुंदर आहे. तेथील निसर्ग, वनस्पती, प्राणी हे मुलांचे सोबती आहेत. कोबड्या, बदके, मांजर, पोपट इ प्राणी मुलांसोबत मुक्तपणे बागडताना आपल्याला या शाळेत दिसतील. काही मुले आपल्याला मैदानावर खेळ खेळताना दिसतील. काही बागेत काम करताना दिसतील. त्यांच्यामागे कोणी शिक्षक नाहीत. कोणी त्यांच्यावर ओरडत नाहीये की असं करू नका, तसं करू नका.



## आनंदी पहाट

## आभासी दुनियेत सावधानता बाळगावी

आधुनिक केसरी

आपल्या दैनंदिन जीवनांत अनेकदा विविध कारणास्तव निरनिराळे अर्ज, माहितीपत्र, बँकांचे के वाय सी, कर्जाच्या संदर्भातील, घर खरेदीच्या वेळी बिल्डर्स बरोबर करावे लागणारे करारनामे, अनेक कायदेशीर प्रक्रियेत पूर्तता करण्यासंबंधीची कागदपत्रे अशा अनेकविध कागदपत्रांवर आपण स्वाक्षरी करण्याअगोदर त्यांचे पूर्ण वाचन, सखोल अभ्यास करत नाहीत. बँकांचे, इन्शुरन्स कंपन्यांचे सर्वच कागद, अगदी काहीवेळा तर काहीही न लिहिलेले कोरे कागद देखील करारनाम्याच्या नावाखाली डोळेझाक करून, अतिविश्वास ठेवून अथवा गरजेपोटी स्वाक्षरी करून आणि त्याची कोणतीही स्थळप्रत, कॉपी आपल्याजवळ संदर्भासाठी न ठेवता आपण संबंधिताकडे जमा करत असतो. आपल्या अभ्यासाच्या अभावामुळे आणि आभासी दुनियेच्या आकर्षणामुळे भविष्यात आपल्यावरच पश्चात्तापाची वेळ येऊ शकते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

काहीवेळा करिअर निवडीचा घेतलेला निर्णय तापदायक ठरल्याचे अनुभवायला येते. आपण करिअर निवडायचे ठरवले खरे परंतू, काहीतरी भलतेच झाले. करिअर निवडण्याच्या वेळेला मार्गदर्शन करणारे खूप जण भेटतात परंतू, योग्य करिअर निवडल्यावर यशप्राप्तीच्या मार्गाचे दर्शन घडवणारी व्यक्ती भेटतेच असे नाही.
एकूणच आपल्या गरजांची पूर्तता करण्यासाठी आणि प्रत्येक अनुभव सुखद असण्यासाठी आवश्यकता असते ती योग्य करिअर निवडून अर्थार्जन करण्याची, पैशाच्या योग्य वापराची, बचतीची आणि गुंतवणुकीची. अनेकांना गुगलवर एखादा पत्ता शोधताना मनस्ताप झाल्याचे अनुभवायला येत असते, समाज माध्यमांव्दारे केल्या जाणाऱ्या खोट्यानाट्या जाहिरातींना भुलून आजवर अनेकांची आर्थिक, मानसिक, शारीरिकदृष्ट्या फसवणूक होत आहे. काही व्यावसायिक वेबसाईटच्या माध्यमातून खोटे आर्थिक व्यवहार करून, बँक खात्याच्या गोपनीय माहितीच्या आधारे ती खातेदाराकडून लबाडीने मिळवून नकळत आर्थिक फसवणूक केली जात असल्याचेही आपण ऐकत आहोत.



आधुनिक केसरी

### तरशील पार | भवसिंधु ||

सात्विका अंतरी | विचार सात्विक ||
व्यवहार नेक | सुखकारी ||१||

विकारी बीजात | विकारीच वृक्ष ||
स्वार्थाचेच लक्ष | घात करी ||२||

लालसेच्या पोटी | वासनेचा जन्म ||
घडतो अधर्म | घात करी ||३||

पापी नराधमा | दंडही अघोरी ||
नसे क्षणभरी | मनःशांती ||४||

घेता हरिनाम | होईल उध्दार ||
तरशील पार | भवसिंधु ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "निरुपण"

आधुनिक केसरी

**यत्कटाक्षसमुपासनाविधिः**
**सेवकस्यसकलार्थसम्पदः ।**
**संतनोतिवचनाङ्गमानसैस्**
**त्वां मुरारिहृदयेश्वरीं भजे ॥१४॥**

जिच्या कृपाकटाक्षासाठी केलेली उपासना उपासकांसाठी संपूर्ण मनोरथ आणि संपत्तीचा विस्तार करणारी आहे, श्रीहरीची हृदयेश्वरी अशा तुझे लक्ष्मीदेवीचे मी मन, वाणी आणि शरीराने भजन करतो.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## 'राम कर्ता' या भावनेने समाधान मिळते



आधुनिक केसरी

पहाटेची वेळ खरोखर फार चांगली. ह्या वेळी कोणी मानसपूजा करीत असतील तर फारच उत्तम. दुसरे कोणी या वेळी झोपेत असतील, तर आणखी कोणी मनोराज्येही करीत असतील. पहाटेपासून तो रात्रीच्या झोपेपर्यंत, मग तो राजा असो किंवा रंक असो, सर्वांची एकच धडपड चालू असते, आणि ती म्हणजे समाधान मिळवायची. प्रत्येकाच्या जीवनाला समाधानाची ओढ लागलेली असते. वास्तविक, खरे समाधान हे कशावरही अवलंबून नाही. ते 'राम कर्ता' ही भावना बाळगल्यानेच मिळू शकते. समाधान मिळवायचे एक अत्यंत सोपे साधन सर्व संतांनी स्वतः अनुभव घेऊन आपल्याला सांगितले आहे, आणि ते म्हणजे नामस्मरण. खरी तहान लागली म्हणजे सहजपणे कोणत्याही नदीचे पाणी प्याले तरी तहान भागते. त्याचप्रमाणे खरी तळमळ असली, म्हणजे सहजपणे नामस्मरण होऊन समाधानाची प्राप्ती होते.
पहाटेच्या वेळी केलेला अभ्यास चांगला होतो असे म्हणतात. तेव्हा या नामस्मरणाच्या अभ्यासाला आपण पहाटेपासून सुरूवात करू या. काकड आरती झाली म्हणजे देवाचे स्मरण संपवावे असे नाही, किंवा सारखी काकड आरतीच करावी असेही नाही. भगवंताचे अखंड स्मरण आणि भाव पाहिजे, यात सर्व काही आले. मला खात्री आहे, तुम्ही आवडीने आणि तळमळीने हा अभ्यास चालू ठेवाल, तर राम तुमचे कल्याण करील.
नाम घेत असताना इतर विचार मनात येत राहतात, अशी सर्वांचीच तक्रार आहे, परंतु असे पाहा, एखादा मनुष्य रस्त्याने चालला असला की, 'तुला रस्त्यात कोण कोण भेटले?' तर तो म्हणतो, 'माझे लक्षच नव्हते.' त्याप्रमाणे आपण नाम घेत असताना या विचारांकडे दुर्लक्ष करावे. त्यांच्या पाठीमागे जाऊ नये, किंवा त्यांच्याबद्दल विचार करीत वेळ फुकट घालवू नये. 'मला विचार विसरला पाहीजे, विसरला पाहीजे,' असे म्हणून का त्याचे विस्मरण होणार आहे ? नामाकडेच जास्त लक्ष द्यावे, म्हणजे विचारांचा आपोआप विसर पडतो, आणि पुढे ते येईनासे होतात.
एकदा वाट चुकल्यावर ती चुकीची वाट परत उलट दिशेने चालावी लागते; आणि मग योग्य रस्ता आल्यावर त्या रस्त्याला लागायचे, हाच अभ्यास; आणि हे सर्व ध्येय गाठेपर्यंत चालू ठेवणे हीच तपश्चर्या, ब्रम्हानंदबुवांनी खरी तपश्चर्या केली. ते एवढे विद्वान, परंतु त्यांनी आपली सर्व बुद्धी रामचरणी लावली. जगातल्या इतर गोष्टींपेक्षा हे केल्याने आपले खचितच कल्याण होईल असे वाटले, म्हणून त्यांनी हा मार्ग पत्करला, आणि त्याला सर्वस्वी वाहून घेतले. तेव्हा, मोठे साधक ज्या मार्गाने गेले त्या मार्गाने आपण संशयरहित होऊन चालावे, त्यात आपले कल्याण आहे.
**आजचे बोधवचन :** नामात राहा आणि राम कर्ता ही भावना दृढ करा.

**- श्री सद्गुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

# गौराईकडून गृहिणींना पत्र...



आधुनिक केसरी न्यूज

प्रिय सखी,
मजेत गेले माझे दिवस... तू माझ्यासाठी प्रेमाचा आणि कष्टाचा किती घाट घातलास हे मी याची देही याची डोळा पाहिले. मी पाहिले तुझी धडपड आणि अविरत काम करणं. मी येणार म्हणून सोवळ्याचा अट्टाहास. पाळी पुढे ढकलण्याचे सगळे प्रकार.... काही वेळा डोळे भरुन आले आणि काही वेळा हसू न आवरण्यासारखे झाले... मग आम्ही दोघीनी ठरवलं की चल आज तुझ्याशीच गप्पा मारू... जसं आम्ही माहेरपणाला येतो तसं तू कुठे गेलीस का गं ? आमच्यासाठी पंचपक्वानं, सोळा भाज्या केल्यास पण तू एकटी असताना शिळं पाकं खाऊन राहणं कसं जमतं? आमच्यासाठी खेळ खेळलेस पण तुझ्यासाठी रोजचा व्यायाम करतेस का गं? आणि हो आम्हाला जेवढा मान तू देतेस, तेवढा स्वतःला मान कधी देतेस का गं? जाता-जाता एक सांगू... जेवढं स्वतःला जपशील तेवढं आम्हाला तू तुझ्यात पाहशील... कधीही कानांनी अनहेल्दी ऐकू नकोस...तोच तो इडियट बॉक्स सुरू असतो तो आणि डोळ्यांनी अनहेल्दी पाहू नकोस... स्वतःमध्ये, .... जसं पंचपक्वानं जसं तयार करतेस तसंच नविन कला शिकत जा, छंद जोपासत जा, स्वतःला वेळ दे... जगत जननीपण इतकं कॅज्युअली घेऊ नकोस... कारण जिच्यामध्ये जन्म देण्याची क्षमता आहे तिने स्वतःला जपलेच पाहिजे आणि आवर्जून सांगते आता जिवंत गौरायांनों थोडासा आराम करा... असूया, गॉसिपिंग आणि जग काय म्हणतं याचा विचार न करता, स्वतःला नव्याने घडवा... आमच्या चेहऱ्यावरचं तेज पाहून जसं तुम्ही खुलता तसं तुमच्या चेहऱ्यावरच्या तेजाने सारं जग बदलू दे...सोवळं नक्की पाळा पण ते तुमच्या विचारांचे... गोळ्या घेऊन पाळया लांबविण्यापेक्षा आरोग्याचा जागर करा. बाकी पुढच्यावर्षी भेटू तेव्हा मला तू माझ्यासारखी दिसली पाहिजेस... मानसिक, शारीरिक सामाजिक आणि आध्यात्मिक हेल्दी!!!!

**-तुझीच गौरी**




## दशभुजा गणेश मंदिर...स्वानंदनगर

आधुनिक केसरी



सुधीर कोर्टीकर,
संपर्क क्र. 9765553312

औरंगाबादच्या मध्यवर्ती ठिकाणी आजूबाजूस असंख्य दुकाने , बँका, हॉस्पिटल्स , नी सतत गजबजलेला हा परिसर.. चेतना नगर, झांबड इस्टेट , जवळ असणाऱ्या हे स्वानंद नगर ..आणि अगदी रस्त्याच्या बाजूला असलेल्या हे दशभूजा गणेश मंदिर. जवळजवळ तीन दशकापूर्वी या ठिकाणी खूप मोठी पडीक अशी विहीर होती .त्यानंतर तिची कचराकुंडी झाली .स्वानंद सोसायटीतील सुंदर वास्तूनी आकार घेतला ..हा परिसर गजबजून गेला ..तेव्हा या पडीक विहिरीचा परिसर कचराकुंडी होऊन गेला.त्याठिकाणी एखाद्ये छान छोटे मंदिर उभारलं जावं ही संकल्पना सौ.शीला विजय लालसरे यांनी आपल्या पतीला बोलून दाखवली.. पंधरा-वीस वर्षांपूर्वी विजय लालसरे यांनी आपल्या सोसायटीतील मित्रांना ही कल्पना सांगितली.. मात्र शाब्दिक पाठबळाशिवाय काही त्यांच्या हाती आले नाही.

तेव्हा या दाम्पत्याने कंबर कसली आणि त्या काळात दीड ते दोन लाख रुपये खर्च करून छोटेसे मंदिर उभे केले आधी धातूच्या गणेश मूर्तीची



स्थापना या मंदिरात केली होती 2001 मध्ये मात्र सध्या दशभुजा असणारी ही मूर्ती राजस्थान म्हणून या ठिकाणी प्रतिष्ठापना केली गेली. ही मूर्ती राजस्थानहून आणली आणि स्वानंद नगरातील अगणित भक्तगणांचे हात त्यासाठी पुढे आले आणि मग सर्वांग सुंदर असं मंदिर.

दशभुजा गणेश मंदिर हे पश्चिऔमाभिमुख असून मंदिराची उंची जवळजवळ 25 फूट आहे. मंदिराचा परिसर नारळाच्या आणि अन्य झाडांची भरून गेलेला आहे .राजस्थानच्या कलावंतांनी संगमरवरात घडवलेली हे सौंदर्यपूर्ण मूर्ती साडेचार फूट उंचीची उजव्या सोंडेची आहे. मंदिराच्या समोर सुंदर असे कारंजे देखील उभा केलेले आहे.

संपूर्ण औरंगाबाद मध्ये एकमेव असा दशपूजा असणारा हा गणेश त्याच्या दर्शनासाठी लोक खूप दुरून येतात .मंदिराच शांत परिसर मनास प्रसन्न करणार आहे. आपण पायऱ्या चढून वर येतो सौंदर्यपूर्ण विलभनीय अष्टभुजा असलेल्या गणेशाचे दर्शन होतं आणि आपण भारावून जातो .सर्वांग सुंदर असं असलेलं गणेशाचे हे रू प खूप मनमोक असच आहे बाजू शांतपणे ठेवणाऱ्या समया सारखे विलक्षण प्रसन्न वातावरण.

मंदिरात सकाळी आठ ते रात्री आठ वाजता यथासांग पूजा आजच्या नित्यनेमाने केली जाते. आणि भक्तांना प्रसाद ही दिला जातो. मंदिरात गणेशोत्सव, गणेश जयंती , अंगारिका चतुर्थी , दसरा , दिवाळी ,याचे उत्सव मंदिरात करण्याची परंपरा आजही कायम आहे. दशभुजा गणेश मंदिरात भजन कीर्तन अथर्वशीर्ष यांची आवर्तने केली जातात. भागवत सप्ताह अशा धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन देखील वर्षभरात आणि उत्सवाच्या माध्यमातून केले जाते. हिरव्यागार नारळींच्या झाडांमध्ये अष्टभुजा असणारी गणेशाची सुंदर मूर्ती ...आखीव रेखीव असे हे सुंदर.. मंदिर बाजूस तेवणारे नंदादीप ..असं मंत्रमुग्ध करणारे हे सारं वातावरण पाहून आपण कोकणातील एखाद्या गणेश मंदिरात आलो नाही ना असं वाटून गेल्यास नवल ते काय.. म्हणूनच आजही खूप दुरून दुरून गणेश भक्त या मंदिरात येतात आणि सुखावून जातात हेच खर.

## पूर्णेत पावसाच्या उघडीपीने वाळलेले सोयाबीन तहसीलदारांना अर्पण...!



आधुनिक केसरी न्यूज

**पूर्णा :** जिल्ह्यासह पूर्णा तालूक्यातील शेत शिवारात जुलै- ऑगस्ट २०२२ या महिन्यात सातत्याने दिड महिना जोरदार अतिवृष्टी झाली होती. त्यामुळे पन्नास टक्यांपेक्षाही अधिक यंदाच्या खरीप हंगामातील सर्व पिके बाधीत होवून नेस्तनाबूत झाली. आणि आता गेल्या बावीस दिवसापासून पाऊसाने एकदमच कमालीची उघडीप दिली आहे. त्यामुळे काही प्रमाणात अतिवृष्टीत कसे बसे तग धरुन उभे असलेली सोयाबीन, कापूस,तूर, ज्वारी ही पिके सुकून वाळून जात आहेत. गत महिनाभरापासून दररोजच दिवसा कडक उन्हं आणि रात्री आकाशात पडणारे टिपूर चांदणे शेतक-याची चिंता वाढवीत आहे.

सध्या जिल्ह्यातील काही मंडळे सोडलीतर अधिकाधिक मंडळात विशेष करुन पूर्णा तालूक्यातील सर्व महसूल मंडळात कोरडा दुष्काळ पसरला आहे. सोयाबीन पिके सुकून वाळून जात आहेत.तरीही कृषी व महसूल खात्यातील अधिकारी कुंभकर्ण झोपेतच असून मोजक्याच क्षेत्राची पाहणी करुन वरिष्ठ महसूल अधिका-याकडे बाधीत माहिती पाठवण्यात आली आहे.नेमून दिलेल्या समितीतील तलाठी,कृषी साह्यक, ग्रामसेवकांच्या टिमने प्रत्येक शिवार फिरुन न पाहता मनमानी पध्दतीने बाधित पिकाची पाहणी पंचनामा अहवाल तयार केला गेला जावून तो गुप्त रीत्या पाठवून सरकारची पाठराखण करीत शेतक-यांच्या पाठीत खंजीर खुपसला आहे. त्यामुळे अतिवृष्टी आनूदानापासून उर्वरित सर्व शेतकरी वंचित राहणार आहेत. याचे गांभीर्य घेऊन शेतक-यांची आणि गोरगरीब जनतेची बुलंद तोफ असलेल्या माजी मंत्री आमदार बच्चू भाऊ कडू प्रणित प्रहार जनशक्ती पक्षाच्या पूर्णा तालुक्यातील कार्यकर्त्यांच्या व शेतक-यांच्या वतीने तारीख ६ सप्टेंबर २०२२ रोजी पूर्णा तहसीलदार यांना वाळलेले सोयाबीन अर्पन करण्यासाठी पूर्णा तहसील कचेरीवर जाऊन निवेदन देण्यात आले .व जर मागण्या मान्य झाल्या नाहीत तर येणाऱ्या काळात प्रहार जनशक्ती पक्ष तहसील कार्यल्यावर भव्य गाडी मोर्चा काढण्यात येईल असा इशारा देण्यात आला या प्रसंगी प्रहार जनशक्ती पक्षाचे उपजिल्हा प्रमुख नरेश जोगदंड.तालुका प्रमुख शिवहार सोनटक्के मंचक कुऱ्हे.श्रीहरी इंगोले. गजानन कुऱ्हे व तालुक्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते....

## पाळजच्या गणरायामुळे विकास शक्य झाला : अशोक चव्हाण




आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** पाळज येथील गणरायाच नावलौकीक संबंध राज्यभर नव्हे तर ईतर राज्यातही आहे. योगायोगाने आज गणेश स्थापणेचा अमृतमहोत्सव साजरा होतो आहे.माझ्या मतदारसंघात हे तिर्थक्षेत्र असल्याने मी स्वताला भाग्यवान समजतो.मी केवळ नाममात्र असुन हे सारं वैभव येथील गणपतीबाप्पा मुळे शक्य झाले आहे.असे प्रतिपादन माजी पालकमंत्री अशोक चव्हाण यांनी मंगळवारी ता.( सहा ) केले आहे.

#पाळज ता.( भोकर )येथील गणेशमंदिर परिसरातील सभामंडपाच्या लोकार्पण सोहळा झाला त्यावेळी ते बोलत होते.व्यासपीठावर आमदार अमरनाथ राजूरकर, सौ.मंगाराणी अंबूलगेकर, बाळासाहेब देशमुख बारडकर, बाळासाहेब पाटील रावणगावकर,नामदेव आयलवाड,पाळजचे सरपंच विशाखा अवधूतवार, गोपीलवाड नरसारेड्डी,नागनाथ घिसेवाड, जगदीश पाटील भोसीकर, रामचंद्र मुसळे,मनोज गीमेकर,ताहेर बेग,मारोती बल्लाळकर, गणेश राठोड,माधव अमृतवाड यांची उपस्थिती होती.श्री.चव्हाण म्हणाले की, पाळज गावातील गणराया हा नवसाला पावणारा गणपती म्हणून नावलौकीक आहे.लाखो गणेश भक्तगण गणेशोत्सव काळात गणरायाच्या पायी नतमस्तक होतात. येथील भक्तगणाची गैरसोय होऊ नये म्हणून सुमारे ४७ कोटी रुपयांचा निधी देऊन विकास केला आहे. काहि जण याच श्रेय घेऊन स्वताची पाठ थोपटून घेतात. खर तर मी अस काहि म्हणणार नाही.हे सार प्राप्त झालेलं वैभव केवळ येथील गणरायाच्या आशिर्वादाने शक्य झाले आहे मी नाममात्र आहे असे सांगितले.प्रास्ताविक सूभाष चटलावार यांनी केले . सूत्रसंचालन गणपत जाधव यांनी करून आभार मानले.भोकर शहरातील ऐतिहासिक महादेव गडावर येथील गणपतीचे विसर्जन केले जाते त्या तलावाची पाहणी करून मोंढा परिसरात डॉ.शकंरराव चव्हाण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने शेतकऱ्यांसाठी उभारलेल्या सुमारे दिड कोटी रुपयांच्या शेडचा लोकार्पण सोहळा श्री.चव्हाणाच्या हस्ते करण्यात आला.यावेळी सार्वजनिक गणेश मंडळांच्या वतीने भागवत सप्ताह आयोजित करण्यात आला होता तीथे भेट देऊन उपस्थित भक्तांना मार्गदर्शन केले आहे.

## सदाबहार गीतांनी रसिकांची मने जिंकली

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** अवीट गोडीने नटलेली गाणी, ठेका धरायला लावणारे संगीत, वन्समोअरच्या फर्माईश आणि गायक कलावंतांच्या सुमधूर गायनाने गणेश उत्सवानिमित्त पिंपळे सौदागर परिसरातील साई पर्ल सोसायटीमध्ये गायनाची मैफल उत्तरोत्तर रंगत गेली. रसिक आणि कलावंतांच्या उत्साहात पार पडलेल्या मैफिलीचा प्रारंभ रितेश झाडे यांनी गायलेल्या ओंकार स्वरुपा...या ईशस्तवनाने करण्यात आला. त्यानंतर कुशाग्र शर्मा, डॉ. पराग घोगळे, प्रवीण गुप्ता, महेंद्र जाधव, श्रीकांत माने, अमीत तोंदले, अरविंद माने, तोरल सेठिया - गोरी, भारती न्यायाधीश, प्रसिद्धी सोनवणे, स्नेहा थुटे, सई पालवे, दर्श शर्मा, अर्जून पाटील, यशवी गोरी, ध्वनी गुप्ता, महिमा झाडे, या कलावंतांनी नव्या - जुन्या चित्रपटातील सदाबहार गाणी सादर करीत उपस्थित रसिकांची मने जिंकली. दोन ते अडीच तास चाललेल्या या मैफलीत पल पल दिल



के पास, चुरा लिया है हमने, जय जय शिवशंकर, क्या हुवा तेरा वादा, सलामे ईश्क, हम तो तेरे आशिक है, आज मोसम है बडा, सोचेंगे तुम्हे प्यार, परदेसीयाँ ये सच है, ये रात भिगी भिगी, मेरी अधुरी कहानी या काही गीतांना उपस्थितांनी टाळ्या आणि शिट्यांच्या गजरात भरभरून प्रतिसाद दिला. प्रसिध्दी सोनवणे या गायिकेने पाच गाण्यातील एकेक अंतरे सादर करीत मैफिलीत वैविध्य दर्शविले. या रंगारंग कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुशाग्र शर्मा आणि तोरल सेठिया - गोरी या दोघांनी केले.



# सर्वात मोठा चोर

आधुनिक केसरी

भारतातील सर्वात मोठ्या वाहन चोराला दिल्ली पोलिसांनी अटक केली आहे. तीन महिन्यांहून अधिक काळ पाठपुरावा केल्यानंतर दिल्ली पोलिसांनी अनिल चौहानला बेड्या ठोकल्या आहेत. अनिल चौहान याच्यावर पाच हजाराहून अधिक गाड्या चोरल्याचा आरोप आहे. अनिल चौहान आपल्या जीवनशैलीमुळे ओळखला जात होता. त्याला महागडे कपडे, सोन्याचं ब्रेस्लेट यांची आवड होती. विशेष म्हणजे त्याच्याकडे तब्बल १० कोटींचा व्हिला होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गाड्यांची चोरी करण्यासाठी अनिल चौहान विमानाने प्रवास करायचा. राजधानीत चोरी केल्यानंतर तो परत जायचा. त्याने गंगटोक, आसाम, नेपाळ आणि इतर काही ठिकाणी आपल्या २५ ते ३० सहकाऱ्यांच्या मदतीने या गाड्यांची विक्री केली. त्याला याआधीही अटक करण्यात आली होती. पण या प्रकरणाचा तपास सहज नव्हता. पोलीस निरीक्षक संदीप गोदरा यांच्या नेतृत्वाखाली पथकाने मध्य दिल्लीमधील महागड्या एसयुव्ही आणि सेदान गाड्यांच्या चोरीचा तपास केला असता अनिल चौहान याच्यावर संशय आला. “आसाम, सिक्कीम, नेपाल आणि एनसीआरमध्ये पथक त्याचा शोध घेत होतं. अटक टाळण्यासाठी तो महागड्या गाड्यांमधून फिरत असे. आपण व्यवसायिक किंवा सरकारी अधिकारी असल्याचं तो भासवत असे. तो कंत्राटदार होता आणि आसाम सरकारसोबत काम करत होता. त्याच्या तिथे अनेक ओळखी होत्या”. २३ ऑगस्टला पोलिसांना चौहान दिल्लीत असून सहकाऱ्यांसोबत चोरी करण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळाली. “आम्ही डीबीजी रोडवरुन त्याला दुचाकी आणि पिस्तूलसहित अटक केली. यानंतर अजून पाच पिस्तूल त्याच्याकडे सापडले,” अशी माहिती अधिकाऱ्याने दिली आहे. गेल्या दोन दशकांमध्ये, चौहान याने केवळ कार चोरल्या नाही तर, शिंगांसाठी गेंड्यासारख्या दुर्मिळ प्राण्यांची शिकारही केली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, त्याने गाड्यांमधून शस्त्रांची तस्करी केली. जवळपास १८१ प्रकरणांमध्ये त्याचा सहभाग असून, कोर्टाने त्याला फरार घोषित केलं होतं. ईडीने याप्रकरणी त्याचा १० कोटींचा व्हिला आणि इतर संपत्ती जप्त केली आहे. “तो अजिबात थांबत नव्हता. त्याला अनेकदा अटक झाली होती. पण सुटका झाल्यानंतर तो पुन्हा चोरी करत असे. आसाम, नेपाल आणि गंगटोक ही त्याची मुख्य ठिकाणं होती. तो दिल्ली, नोएडा, मेरठ येथून कार चोरायचा आणि या ठिकाणी पोहोचवायचा. पोलिसांनी संशय येऊ नये यासाठी एक ते दोन महिन्यात कारची विक्री होत असे. आपल्या गुन्ह्यात सहभाग नाही दाखवण्यासाठी तो विमानाने प्रवास करत आपल्या ठिकाणी लपत असे,” असं पोलिसांनी सांगितलं आहे. चौहानला तीन पत्नी आणि सात मुलं आहेत. ईडीचा छापा आणि अटकेनंतर ते त्याला सोडून गेले होते. दोन पत्नींनी आपल्याला त्याच्या गुन्ह्यांबद्दल काही माहिती नव्हती असा दावा केला आहे. “जानेवारी महिन्यात आसाममधून त्याला अटक करण्यात आली होती. पण त्याची जामिनावर सुटका झाली होती. यावेळी आम्ही कोर्टात त्याच्याविरोधातील सर्व पुरावे सादर करणार असून, लवकर जामीन मिळणार नाही यासाठी प्रयत्न करणार आहोत. रेकॉर्डनुसार, १९९० मध्ये त्याने चोरीला सुरुवात केली होती. अनेक केसमध्ये त्याला दोषी ठरवण्यात आलं आहेत. परदेशात अंमली पदार्थांची तस्करी करण्याचाही त्याचा प्रयत्न होता,” अशी माहिती डीसीपी श्वेता चौहान यांनी दिली आहे.



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

# जलप्रदूषणाचा वाढता धोका

आधुनिक केसरी

**औद्योगिकीकरण, शहरीकरण, वाढती लोकसंख्या आणि बदलते हवामान या अनुषंगाने स्वच्छ पाण्याचा अभाव ही देखील आंतरराष्ट्रीय समस्या बनली आहे. दिवसेंदिवस भूभाग कोरडे होत जाणे आणि दूषित पाण्याच्या स्त्रोतांमुळे मानवावर अनेक प्रकारे परिणाम होत आहे. महत्त्वाचं म्हणजे त्याचा लोकांच्या आरोग्यावर तसेच पर्यावरण आणि अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होतो. आकडेवारी दर्शवते की असुरक्षित पाण्यामुळे दरवर्षी सुमारे एक अब्ज लोक आजारी पडतात.युनेस्कोच्या जागतिक जल विकास अहवाल-2022 मध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, जगातील जवळपास निम्मी लोकसंख्या अशा भागात राहते जिथे वर्षातून किमान एक महिना पाण्याचे गंभीर संकट ओढवते.**

या अहवालानुसार भारत हा जगातील सर्वात मोठा भूजल वापरणारा देश आहे. खरे तर जलस्रोत आकुंचन पावल्याने आणि जलप्रदूषणात वाढ झाल्याने भूगर्भातील पाणी झपाट्याने दूषित होत आहे. दूषित पाणी प्यायल्याने रोगप्रतिकारशक्ती कमी होणे, आयुर्मान कमी होणे आणि अकाली मृत्यूचा धोकाही वाढणे अशा गोष्टी घडत आहेत.

या संदर्भात जागतिक आरोग्य संघटनेच्या (डब्ल्यूएचओ) अहवालात असे म्हटले आहे की जगातील एकूण लोकसंख्येच्या एक चतुर्थांश लोकसंख्येला किंवा सुमारे दोन अब्ज लोकांना दूषित पाणी पिण्यास भाग पाडले जाते. त्याच्या धोक्याबाबत डब्ल्यूएचओ म्हणते की दूषित पाण्याच्या सततच्या सेवनाने डझनभर आजारांचा धोका वाढतो. दूषित पिण्याचे पाणी पिण्याचा शाप असलेल्या लोकसंख्येला कॉलरा, टायफॉइड, अतिसार, कुपोषण, कर्करोग, केस आणि पोटाशी संबंधित आजारांना सामोरे जावे लागते. पाणी हे सार्वत्रिक विद्रावक असल्याने ते सहज प्रदूषित होते. पाण्यात प्रामुख्याने आर्सेनिक, फ्लोराईड आणि नायट्रेट, औद्योगिक आणि कृषी कचरा, मायक्रोप्लास्टिक, वैद्यकीय कचरा इत्यादी दूषित घटक असतात. तांबे, शिसे, क्रोमियम आणि किरणोत्सर्गी घटक इत्यादी देखील पाण्याच्या स्त्रोतांच्या संपर्कात आल्यावर पाणी दूषित करतात आणि ते प्राणघातक बनतात. याशिवाय प्रक्रिया न केलेल्या पाण्यात जीवाणू, विषाणू आणि परजीवी यांसारखे जैव-दूषित घटकदेखील असतात. पाण्यात असलेली रसायने, धातू आणि सूक्ष्मजीव विविध प्रकारचे धोके निर्माण करतात.

इंटरनॅशनल एजन्सी फॉर रिसर्च ऑन कॅन्सरने फुफ्फुस, मूत्राशय, हृदय, त्वचा आणि मूत्रपिंडाच्या कर्करोगाचे कारण म्हणून आर्सेनिकला जबाबदार धरले आहे. पिण्याच्या पाण्यात आर्सेनिकचे प्रमाण 10 मायक्रोग्रॅम प्रति लिटरपेक्षा जास्त नसावे, असे जागतिक आरोग्य संघटनेचे मार्गदर्शक तत्त्व आहे. पण जगभरात चौदा कोटी लोक पिण्याच्या पाण्यातून आर्सेनिकचे उच्च प्रमाण सेवन करतात. याशिवाय शिसे हे विषारी प्रदूषक देखील आहे, जे पाणी दूषित करते. जागतिक आरोग्य संघटनेचा अंदाज आहे की जगभरात दोन अब्जाहून अधिक लोक शिसेयुक्त दूषित पाणी पितात. क्रोमियम हा देखील असाच एक घटक आहे, ज्यामुळे पाणी दूषित आणि विषारी बनते. जेव्हा पाण्यात क्रोमियमचे प्रमाण प्रति लिटर पंचवीस मायक्रोग्रॅमपेक्षा जास्त होते, तेव्हा ते पाणी विषारी बनते. क्रोमियम मिश्रित पाण्याचे सेवन केल्याने पुरळ, मूत्रपिंड आणि यकृत विषारीपणा, कर्करोग, शुक्राणूंचे नुकसान आणि अशक्तपणा यांसारख्या आजारांचा धोका वाढतो.

मायक्रोप्लास्टिक्स हे पाच मायक्रोमीटरपेक्षा कमी आकाराचे प्लास्टिकचे छोटे तुकडे आहेत जे अदृश्य असल्याने पिण्याचे पाणी किंवा बाटलीबंद पाण्याद्वारे मानवी शरीरात सहज प्रवेश करू शकतात आणि प्रजनन, रोगप्रतिकारक शक्तीवर प्रभाव, लठ्ठपणा आणि पोटाच्या समस्या निर्माण करतात.

त्याचप्रमाणे नायट्रेट्सचा सामान्य स्त्रोत म्हणजे औद्योगिक खते. जेव्हा पिण्याच्या पाण्यात नायट्रेटचे प्रमाण प्रति लिटर दहा मिलीग्रामपेक्षा जास्त होते तेव्हा आरोग्य धोक्यात येते. नायट्रेट प्रदूषित पाण्याच्या सेवनाने कर्करोगासारख्या आजारांचा धोका वाढतो.प्रदूषक इतके बारीक असतात की, पाण्यात विरघळल्यावर उघड्या डोळ्यांना दिसत नाहीत. पाण्यातील घन धातू टीडीएस (एकूण विरघळलेले घन) द्वारे शोधले जातात. हे पाण्यात विरघळलेल्या अशुद्ध कणांचे प्रमाण म्हणून पाहिले जाते. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार पाचशे टीडीएसपर्यंतचे पाणी पिण्यायोग्य असते, मात्र यापेक्षा जास्त पाणी न फिल्टर करता पिल्याने आरोग्याला मोठी हानी होते. मात्र, जनजागृती आणि स्वच्छ पाण्याचे स्रोत नसल्याने मोठी लोकसंख्या दूषित पिण्याचे पाणी पिण्यास हतबल आहे.



Photo: Stéphane Bidouze

गरिबी आणि माहितीच्या अभावामुळे ज्यांना या परिस्थितीचा सामना करता येत नाही, ते अकाली मरण पावतात.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळानुसार देशातील साडेतीनशेहून अधिक नद्या प्रदूषणाने दुथडी भरून वाहत आहेत. अनेक नद्यांची जलीय परिसंस्था वर्षभर प्रदूषकांनी भरून राहिल्याने नष्ट होण्याच्या मार्गावर आहे, त्यामुळे त्या जैविक दृष्ट्या मृत होण्याचा धोका आहे. या संदर्भात लंडनच्या प्रसिद्ध थेम्स नदीची आठवण करता येईल, जी 1957 मध्ये जैविक दृष्ट्या मृत घोषित करण्यात आली होती. मात्र सहा दशकांच्या प्रदीर्घ संघर्षानंतर गेल्या वर्षी प्रदूषणमुक्त करण्यात यश आले.थेम्सचे जैविक दृष्ट्या मृत आणि जिवंत होणे ही घटना जागतिक समुदायासाठी एक मोठा धडा आहे,हे यासाठी की, जल प्रदूषण नियंत्रित न केल्याने विविध दुष्परिणाम होतात. प्रदूषणामुळे पाण्यातील ऑक्सिजनचे प्रमाण कमी होते, त्यामुळे जलचरांचे जीवन जगणे कठीण होते. दुसरीकडे, प्रदूषित पाण्याने सिंचन केल्याने धान्य, फळे आणि भाज्यांमध्ये दूषित घटकांचे प्रमाण वाढते, जे रोग आणि मृत्यूला आमंत्रण देतात.

दुसरीकडे, जलप्रदूषणाचा अर्थव्यवस्थेवरही परिणाम होतो. जागतिक बँकेच्या अहवालानुसार, जगातील पाण्याच्या गुणवत्तेतील घसरणीमुळे प्रदूषित प्रदेशांमध्ये संभाव्य आर्थिक वाढीपैकी एक तृतीयांश घट होते. आर्थिक विकासात शुद्ध पाणी महत्त्वाची भूमिका बजावते. याच्या सुलभतेमुळे नागरिकांचे जलजन्य रोगांपासून संरक्षण करून त्यांची कार्यक्षमता वाढते आणि आर्थिक बचतही होते, परंतु दरवर्षी कोट्यवधी रुपये पाणी स्वच्छ करण्यासाठी आणि प्रदूषित जलस्रोतांना स्वच्छ करण्याच्या प्रणालीवर खर्च केले जातात.प्रदूषित जलस्रोतांमध्ये पर्यटन क्षेत्र प्रभावित होतात, ज्यामुळे या उद्योगाला दरवर्षी एक अब्ज डॉलर्सचे नुकसान होते. जलप्रदूषणामुळे, लोकांच्या शारीरिक आणि मानसिक विकासावर परिणाम होतो, ज्यामुळे ते परिपक्व मानव संसाधन म्हणून विकसित होऊ शकत नाहीत. अशा प्रकारे जलप्रदूषणाचा राष्ट्रीय उत्पन्नावर विपरीत परिणाम होतो. सत्य हे आहे की देशातील मोठ्या लोकसंख्येला शुद्ध पाणी उपलब्ध नाही किंवा पाणी स्वच्छ करण्यासाठी तंत्रज्ञानही उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत जाणूनबुजून किंवा नकळत लोक त्यांच्या आरोग्याला हानी पोहोचवत असतात. शाश्वत विकासाचे 6.1 लक्ष्य सुरक्षित आणि परवडणाऱ्या पिण्याच्या पाण्याच्या सार्वत्रिक आणि न्याय्य ध्येयावरदेखील भर देते. अशा प्रकारे, 2030 पर्यंत लक्षित शाश्वत विकास उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सार्वत्रिक उपलब्धता ही एक महत्त्वाची व्यावहारिक बाब आहे. तथापि, हे तेव्हाच शक्य आहे जेव्हा जलसंधारण आणि साठवण हे मूलभूत कर्तव्य बनते आणि लोकांना पाण्याच्या प्रत्येक थेंबाची किंमत समजू लागते. पृथ्वीचा तीन चतुर्थांश भाग पाणी असूनही, त्यातील फक्त एक टक्का आपल्या आवाक्यात आहे. त्यामुळे जलसंधारणावर गांभीर्य दाखवावे लागेल. त्याचबरोबर जलस्रोत प्रदूषित करण्याच्या सवयीवरही नियंत्रण ठेवावे लागेल.- मच्छिंद्र ऐनापुरे, जत जि. सांगली



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

# सेरेना विल्यम्स : टेनिसची अनभिक्षित सम्राज्ञी

आधुनिक केसरी

**सेरेना ही केवळ एक खेळाडू नाही तर ती एक प्रेरणास्रोत आहे. तिच्याकडून प्रेरणा घेऊनच अनेक मुलींनी टेनिसमध्ये करियर करण्याचा निर्णय घेतला. आज ती निवृत्त झाली असली तरी एक महान खेळाडू म्हणून तिचे नाव इतिहास नोंदले गेले आहे. जिद्द, चिकाटी, मेहनत, ताकद आणि जिंकण्याची ईर्षा या शब्दांचा पर्यायी शब्द बनलेल्या सेरेना विल्यम्सला निवृत्तीनंतरच्या आयुष्याला शुभेच्छा!**

गेली २५ वर्ष महिला टेनिसवर एकहाती हुकूमत गाजवणारी टेनिसची अनभिक्षित सम्राज्ञी सेरेना विल्यम्स हिने अखेर टेनिसला रामराम केला. अमेरिकन ओपन टेनिस स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीतील ऑस्ट्रेलियाच्या अजला टॉमलजानेविच विरुद्धचा सामना हा तिच्या कारकीर्दीतला शेवटचा सामना ठरला. या सामन्यात तिला पराभव स्वीकारावा लागला तरी आपल्या शेवटच्या सामन्यात तिने दाखवलेली जिद्द, उत्साह आणि जिंकण्याची ईर्षा यात काहीही कमतरता दिसली नाही. सामना संपल्यानंतर भावुक झालेल्या सेरेनाने आपल्या २५ वर्षांच्या कारकिर्दीचा आढावा घेताना म्हटले की माझ्यासाठी २५ वर्षाचा काळ हा अविश्वसनीय होता. यावेळी तिने तिचा उत्साह वाढवणाऱ्या सर्व व्यक्तींचे आभार मानले. निरोपाचे तिचे शब्द ऐकून सचिन तेंडुलकरच्या निवृत्तीच्या भाषणाची आठवण झाली. क्रिकेटमध्ये जे सचिनचे स्थान आहे तेच टेनिसमध्ये सेरेनाचे आहे. दोघांच्याही कारकीर्दीवर नजर टाकली तर अनेक साम्य पाहायला मिळतील. सचिनने तब्बल २४ वर्ष आंतरराष्ट्रीय क्रिकेट गाजवले तर सेरेनाने २५ वर्ष. सचिन वयाच्या ४० व्या वर्षी निवृत्त झाला तर सेरेना ४१ वर्षी सचिनप्रमाणेच सेरेनाने अनेक विक्रम रचले. सचिन प्रमाणेच तिनेही लहान वयातच टेनिस खेळायला सुरवात केली. वयाच्या चौथ्या वर्षीच टेनिसची रॅकेट हातात धरलेल्या सेरेनाने लहान वयातच टेनिसमधील आपले कौशल्य दाखवायला सुरवात केली. दहा वर्षाखालील टेनिस स्पर्धेत तिने विजय मिळवत आपली चुणूक दाखवून दिली. १९९५ साली वयाच्या १४ व्या वर्षी व्यावसायिक स्पर्धेत भाग घेतलेल्या सेरेनाने लवकरच यशाची शिखरे गाठली. वयाच्या १७ वर्षी सेरेनाने अमेरिकन खुली टेनिस स्पर्धा जिंकून पहिले ग्रँडस्लॅम जिंकले. अंतिम फेरीत तिने मार्टिना हिंगिस सारख्या दिग्गज खेळाडूचा पराभव केला होता. त्यानंतर तिने तब्बल २३ ग्रँडस्लॅम स्पर्धा जिंकण्याचा विक्रम केला. यादरम्यान एकाच वर्षात चार ग्रँडस्लॅम आणि ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकून गोल्डन ग्रँडस्लॅम पूर्ण करण्याचीही किमयाही तिने केली. आपल्या समकालीन सर्व खेळाडूंचा पराभव करून तिने जवळपास २५ वर्ष तिने टेनिसवर एकहाती राज्य करून स्टेफी ग्राफ, मार्टिना नवरतिलोवा, ख्रिस एव्हर्ट यासारख्या महान खेळाडूंच्या पंक्तीत स्थान मिळवले. कोणताही खेळाडू सलग २५ वर्ष कोणत्याही खेळात एकहाती हुकूमत गाजवू शकत नाही. वयाच्या ३० व्या वर्षापासून खेळाडूंची कारकीर्द उताराला लागते. मात्र सेरेनाने वयाच्या ४१ व्या वर्षापर्यंत कारकीर्द गाजवली. इतकी दीर्घ कारकीर्द राखण्यासाठी प्रचंड फिटनेस राखावा लागतो. सेरेनाने तो राखला यासाठी तिला सलाम करावाच लागेल. हे केवळ फिटनेसनेच साध्य होते असे नाही तर त्यासाठी प्रचंड, जिद्द आणि चिकाटी लागते सेरेनाने ती दाखवली. या दरम्यान तिला अनेकदा टिकेलाही सामोरे जावे लागले. तिचे कपडे, तिची ताकद आणि तिचा वर्ण यावरून तिला अनेकदा ट्रोलही केले गेले मात्र तिने त्याकडे दुर्लक्ष करून आपल्या खेळावर लक्ष केंद्रित केले त्याचेच फळ तिला मिळाले. वयाच्या पस्तिशीत तिला प्लमनरी आंबोलिझम हा दुर्मिळ आजार झाला. या आजारात फुफ्फुसात रक्ताच्या गुठळ्या होतात. हा आजार झाल्यावर तिची कारकीर्द संपली असे म्हटले गेले मात्र जिद्दी सेरेनाना या आजारावर देखील मात केली. लग्नानंतर तिने दोन जुळ्या मुलींना जन्म दिला. लग्न आणि मुले झाल्यावर महिला खेळाडूंची कारकीर्द संपते असे मानले जाते मात्र सेरेनाने दोन जुळ्या मुलींची आई झाल्यानंतरही अनेक ग्रँडस्लॅम जिंकून सुपर मॉम झाली.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# शिक्षक बादशहा नसतो, पण बादशहा नक्कीच घडवितो...



भरत कोळी
बॉक्सिंग प्रशिक्षक, धुळे

आधुनिक केसरी

**शिक्षक जेव्हा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या जीवनशैलीला आकार देत असतो तेंव्हा शिक्षक म्हणून तो खूप सावधगिरी बाळगत हसत खेळत त्याला भविष्यात मोठी गरुडझेप घेऊ शकेल असा किंमतीवान हिरा तयार करण्याचं बहुमोल कार्य शिक्षक हा नियमित करत असतो आज जे काही शिक्षकांचे प्रश्न उपस्थित राहिले आहेत ना त्यावर तोडगा म्हणून एकदा शिक्षकांची भूमिका शाळेत करून पहा मग समजेल की बादशहाला घडवणारा कोण असतो तो म्हणजे एक शिक्षक असतो हे आम्हा तुम्हाला विसरता येणार नाही.**

मला नेहमीचं जीवनाच्या प्रत्येक प्रवासात अनेक शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले अशा सर्व माझ्या गुरू समान सर्व आदरणीय शिक्षकांना शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा, 5 सप्टेंबर हा भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. राधाकृष्ण सर्वपल्ली यांचा जन्मदिवस हा संपुर्ण भारतात शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात येतो आणि याचा मोठा उत्साह हा शाळा, महाविद्यालय स्तरावर पाहायला मिळत असतो. या दिवशी शिक्षकांना व शाळेतील सर्व कर्मचारी यांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छाचा वर्षांव हा विद्यार्थ्यांकडून होतो तर शाळेतील विविध विषय शिक्षकांच्या भूमिकेत विद्यार्थी दिसतात व शिक्षकांचा प्रत्यक्ष अनुभव हा विद्यार्थ्यांना येतो आणि शिक्षकांचा अनुभव विद्यार्थ्यांसमोर या दिवशी शाळेत सांगितले जातात. असा शिक्षक दिन प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरतो.मी ही इयत्ता ८ वी ९ वी मध्ये असताना शिक्षकाची भूमिका केली होती, त्याचबरोबर कॉलेजमध्येही शिक्षकांची भूमिका मी उत्तम प्रकारे साकारली होती याची मला आयुष्यभर आठवण राहील, पण खऱ्या अर्थाने पाहायला गेलं तर शिक्षकांची भूमिका साकारणं हे खूप अवघड आहे असं मला नेहमी वाटतं कारण कुंभार ज्याप्रमाणे मातीच्या भांड्याला आकार देतो तेंव्हा तो खूप सतर्कता बाळगत असतो. कारण भांडे तयार करताना त्याचा आकार बदलला तर त्याला बाजारात किंमत राहणार नाही असंच काहीसं शिक्षकाच्या बाबतीत म्हणावं लागेल. शिक्षक जेव्हा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या जीवनशैलीला आकार देत असतो तेंव्हा शिक्षक म्हणून तो खूप सावधगिरी बाळगत हसत खेळत त्याला भविष्यात मोठी गरुडझेप घेऊ शकेल असा किंमतीवान हिरा तयार करण्याचं बहुमोल कार्य शिक्षक हा नियमित करत असतो. आज जे काही शिक्षकांचे प्रश्न उपस्थित राहिले आहेत ना त्यावर तोडगा म्हणून एकदा शिक्षकांची भूमिका शाळेत करून पहा मग समजेल की बादशहाला घडवणारा कोण असतो तो म्हणजे एक शिक्षक असतो हे आम्हा तुम्हाला विसरता येणार नाही.

विद्यार्थी व शिक्षकांचे नातं म्हणजे खूप वेगळं असतं, त्याला आपण इतक्या लवकर समजू शकत नाही कारण हे नातं आपल्याला खूप दिवसांनी समजतं जेंव्हा आपण एका मोठ्या



पदावर कार्यरत असतो, तेंव्हा त्या नात्याची खरी जाणीव होत असते त्यावेळेस त्या शिक्षकांची आठवण प्रत्येक क्षणो-क्षणी येत असते आणि अभिमानाने सांगत असतो की ते आमचे शिक्षक आहेत.खरंतर आपले शिक्षकही खूप अभिमानाने सांगतात की तो माझा विद्यार्थी आहे, खरंतर तर आपल्याला कुठेही शिक्षक भेटले की लगेच आपण जवळ जात त्यांना सांगतो की सर आपण कसे आहात सर्व ठीक आहे का शाळेत. आमच्या सारखे विद्यार्थी आता आहेत का? असे अनेक प्रश्न उपस्थित करत शाळेतील आठवणींना उजाळा देत असतो व त्या आठवणी नेहमी आपल्यासोबत असतात. आजच्या शाळेत फडा रंगित आणि ऑनलाईन झाला पण आमच्या वेळेस शाळेतील भिंतीवर एक मोठा काळा फळा होता आणि त्या काळ्या फळ्यावर खूप काही शिकवलं जात होतं. त्यात शिकवलेली प्रत्येक गोष्ट ही सांगत होती की बादशहा कसा बनाव पण त्या बादशहाला घडवणारा फक्त शिक्षक असतो हे आज मला समजलं. मी आजपर्यंत अनेक व्यक्तींना भेटलो आणि त्यांनी प्रत्येक वेळी आपल्या शिक्षकांनी दिलेलं योगदान हे नेहमी मार्गदर्शन करत असते, हे मी त्यांना भेटल्यावर अधिक समजू शकलो आणि ती सर्व व्यक्ती श्रेय आपल्या शिक्षकांना नेहमी देतात. मी माझ्या आयुष्यात पहिल्यांदाच खूप आनंदी आहे कारण मला जेंव्हा समजायला लागलं तेंव्हा खऱ्या अर्थाने शिक्षक समजले. माझ्या आयुष्याला मी जो आकार देण्याचा ध्यास घेतला आहे त्यात माझ्या शिक्षकांचा फार मोठा बहुमोल सहभाग आहे. मी हे अभिमानाने सांगेल अगदी अंगणवाडी सेविका का पासून ते कॉलेजच्या प्राध्यापकापर्यंत सर्वांचा वाटा माझ्या आयुष्यात आहे. त्याचबरोबर मला क्रीडा क्षेत्रात ज्यांनी चालायला शिकवलं ते माझे गुरू मार्गदर्शक क्रीडा संचालक एल. के. प्रताळे सर, मयुर बोरसे सर, मयुर ठाकरे, चंद्रशेखर आगाशे, शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राध्यापक वर्ग यांचे नेहमीचं सहकार्य मला लाभत असतं. अनेक जण मला म्हणतात की तू खूप एकटा राहायला लागला आहे, पण मला त्यांना सांगावं असं वाटतं की मी एकटा कधीच राहत नाही. कारण माझ्यासोबत नेहमीचं त्या सर्व शिक्षकांच्या आठवणी असतात त्यामुळे मी कधीही एकटा राहत नाही. मला आनंदी राहायला खूप आवडतं, पण आनंदी राहण्यासाठी स्वतःची ताकद असणं फार महत्त्वाचे आहे. एकदा माझ्या दहावीच्या शिक्षकाने एक प्रश्न विचारला होता तो आजही मला नेहमी पडतो. प्रश्न खुप सुंदर होता, तुला स्वतःच्या पायावर उभं राहणं आवडतं की बाबांच्या कमाईवर जगणं आवडतं? त्यावेळी मला उत्तर भेटलं नाही, पण काही दिवसापूर्वी मला उत्तर नक्कीचं मिळालं तेंव्हा मी विचार केला की एकटं कधी राहायचं नाही तर सोबत शिक्षकांचे विचार असायला हवे तेंव्हा बादशहा होऊन आपल्या पायावर आपण उभं राहू शकतो आणि जगाला सांगू शकतो आई-वडिलांना जन्मभर त्रास नको तर आई-वडिलांची सेवा करणं हा फार मोठा धर्म आहे हेचं माझ्या शिक्षकांनी मला नेहमीचं शिकवलं आहे म्हणून ते मला बादशहा घडविणारे एक बहुमोल असे द्रोणाचार्य आहेत.मी अनेक शिक्षकांना जवळून पाहिलं आहे. आपण एक चित्रपट असतो, पण आपल्या चित्रपटाचा निर्मितीकार पडद्या मागे असतो कधी-कोणीही विसरू नये.

माझ्या सर्व प्रिय शिक्षकांना शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा, माझ्यासाठी रोजचं शिक्षक दिन आहे कारण आयुष्य एका दिवसाचे नाही, तर १०० वर्षांचे असण्यासाठी मला पैशांची गरज नाही शिक्षकांच्या विचारांची गरज आहे.

# डोळे नसूनही जग पाहणारे, अनुभवणारे एक अनोखे व्यक्तिमत्त्व



लक्ष्मण वाल्डे
मो.नं. 8888606068

आधुनिक केसरी

**सोशल मीडियाच्या माध्यमातून बरेच संघर्षमय लोक संकटावर मात करून पुढे येतांना दिसताय डोळ्यांने अंध, हातपायाने अपंग व्यक्ती आज इतिहास घडवतांना दिसत आहे. अशक्य ते शक्य करुन दाखवत आहे. तर आपण सर्वांगीण परिपूर्ण असूनही, आपल्यातला आळशीपणाच्या अपंगत्वावर आपण का? मात करु शकत नाही. का? आपण जिंकू शकत नाही. का? आपण यशस्वी होऊ शकत नाही असे उत्तरे आपल्या मनाला का? खात नाही. का? अशा व्यक्तींकडून आपण प्रेरीत होत नाही. का? सतत कारणांचे भारे बांधत असतो.**

असामान्यातून सामान्य जीवन जगणारा दृष्टी नसूनही, ही दुनिया बघणारा. अनुभवणारा, सगळ्याच सुख दुःखाना आपल्या झोळीत झुलवणाऱ्या अशा एका अंध व्यक्तीची ही खरी-खुरी कहाणी.

ते म्हणता ना सुखाची गोडी चाखायची असेल तर कडूलिंबाहून कडू दुःख पहिले पचवले पाहिजे.अ नेक संकटावर ध्यैर्याने मात । करावी लागते. पुन्हा-पुन्हा हताश झालो तरी नव्याने पुन्हा-पुन्हा उठाव लागत. जिद्दीने लढावं लागतं. तेव्हा कुठे योग्य वेळ येते नि सुखाने झोळी भरते.

तालुक्याजवळ अवघ्या काही कि. मी. अंतरावर एका छोट्या खेड्यागावात श्रीराम काका नावाचे एक अंध व्यक्ती राहतात. ते आता ५० वर्षाहून अधिकाधिक वयाचे असावे. त्या व्यक्तीला पाहिलं, की मनात एक नवीन स्पुर्ती संचारते. आणि वाटतं या हताश जगण्याशी दोन हात करावे. पुन्हा नव्या जोमाने लढावे, असे मनो-मनी भासून यावे, जेव्हा त्यांच्याविषयी कळाले. जीवनात हारलेल्या प्रत्येक माणसाला नव्याने जगण्याचं हूरुप येतो. अशी ती प्रेरीत व्यक्ती.

त्यांची खरी कहाणी सुरु होते. त्यांच्या जन्मल्यापासून. त्यांच्याकडून कळाल की, त्यांना कळतही नव्हत. तेव्हापासून त्यांना काही दिसत नाही. त्यांच्याकडून नि लोकांनकडून त्यांच्याविषयी कळालं की, ते जवळजवळ सगळ्याच लोकांना आवाजावरुन ओळखतात.चलनातील नोटा-नाणी स्पर्शाने सहज त्यांना समजतात. ते अख्या गावात, गावभर फिरतात. गावातल्या सगळ्याच दुकानांवर जातात.चहा प्यायला हॉटेलमध्ये सुद्धा येतात. वेळप्रसंगी कधी कधी तर एकटेच रिक्षात बसून तालुक्यालाही जातात म्हणे.! घे-आन करायला. त्यांच स्वःताच एक स्वतंत्र कुटुंब आहे. त्यांच्या कुटुंबात बायको, मुलगा, मुलगी, सून, जावई, नातवंडे असा सगळा त्यांचा सुखी परिवार आहे. आज सगळेच जण त्यांच्याशी गुणगोविदांने राहत. आणि तेही त्यांच जीवन अगदी आनंदाने जगतात.

त्यांच्याकडे बघून नवीन माणसाला तर संशयच येतो. पहिले मनात.छे. ! कसलं..! अंधत्व..! नाटक असेल सगळ भिक मागण्यासाठी. पण जेव्हा त्यांची खरी कहाणी कळते. तेव्हा कळत की असा एखादा निस्वार्थ अंध माणूस आपलं आयुष्य सुखात जगतो. तेही त्याच्या स्वबळावर. तेव्हाच खरच कमाल वाटते. आणि अभिमानही. तसा तर देव आपल्यावर खूप जास्त मेहरबान आहे म्हणायचं आपण पाहू शकतो. चालू शकतो.दोन्ही हाताने काम करु शकतो. मनात जे ठरवू ते करू शकतो. जगात श्रीरामकाका सारखे आणखी, वेगवेगळ्या अपंगत्वावर मात करून सुखी जिवन जगणारे असंख्य उदाहरणे, कितीतरी नावे, आज आपल्या डोळ्यासमोर उभे आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून बरेच संघर्षमय लोक संकटावर मात करून पुढे येतांना दिसताय डोळ्यांने अंध, हातपायाने अपंग व्यक्ती आज इतिहास घडवतांना दिसत आहे. अशक्य ते शक्य करुन दाखवत आहे. तर आपण सर्वांगीण परिपूर्ण असूनही, आपल्यातला आळशीपणाच्या अपंगत्वावर आपण का? मात करु शकत नाही. का? आपण जिंकू शकत नाही. का? आपण यशस्वी होऊ शकत नाही असे उत्तरे आपल्या मनाला का? खात नाही. का? अशा व्यक्तींकडून आपण प्रेरीत होत नाही. का? सतत कारणांचे भारे बांधत असतो.

त्यांना देवाने जे दिलं नाही. त्यावर ते रडत बसले नाही. त्यावर त्यांनी मात केली. त्यांच्या मेहनतीतून आज सगळं सुख त्यांनी देवाकडून त्यांच्या सातत्याच्या परिश्रमाच्या बळावर हिसकावून घेतलं. त्यांनी त्यांच्या अपार मेहनतीच्या साधनेतून ते प्राप्त केलं. तस ते आपल्यालाही शक्य आहे. एक अंध व्यक्ती त्याच्या अंधत्वातून हे जग पाहू शकतो.अनुभवू शकतो. तर आपल्या अंगी धडधाकटपणा असूनही आपण मागे का ? असे पाहून ,एकूण स्वतःला लाज वाटत नाही का ? स्वतःवर चीड येत नाही का ?अस पाहिल्यावर मनात तगमग होऊन ,रक्त खवळत नाही का ? हे जग जिंकायचे बळ आपल्याला एखादा अंध माणूस, अपंग माणूस देतो. तरी आपल्या डोक्यात घुसत नाही. आपल्या निर्लज्जपणाच्या दहशतीखाली, का ? जिवंत असूनही ,मेल्यागत जगतो आम्ही .

# देशाचे आधारस्तंभ शिक्षक

आधुनिक केसरी

शि -शिकवणारा, क्ष -क्षमाशील, क -कर्तव्यनिष्ठ.

अहो, आज घरीच रहा. गौरी गणपतीचा सण अगदी तोंडावर आलाय हो.!

आणि खूप दिवस तुम्ही रजाही घेतली नाहीत . मुलांसाठी खूप दिवस काही खरेदीही केलीनाही. मुलांना जरा बरे वाटेल हो... आणि जून मधे जशी शाळां सुरू झालीय ना! तेव्हा पासून एकदा ही माहेरी गेली नाही हो, आता जाऊ याना ? ......

आणि बर का हो ,आज जरा बाहेरच जेवण करुयात . खूप दिवस मुलांनी बाहेरच खाल्लेच नाही हो...

अस काय हो करता, तो पेपरचा गठ्ठा ठेवा आता बाजुला ....रात्रंदिवस आपले शाळा,शाळा आणि मूले,मूले करत असता.....

अगदी रविवारी म्हटले कोठे जावे तरी आहेच यांची काहीतरी कागदं पुढ्यात...म्हणे काय तर मुलांचे पेपर काढायचेत,शाळेतील शैक्षणिक साहित्य आणायचं आहे.... तालुक्याला मिटींग आहे.

कधी कधी वाटतं यांनी माझ्याशी लग्न केलय की, नोकरीशी......

सकाळी उठले,की सुरुवातच होते, झाला की नाही डबा ..? अग जादा तास आहे...उशीर झाला की पालक ओरडतात....

दिवाळी आणि उन्हाळ्यात जरा बरे वाटते जरा निवांत वाटते, आणि मुले तर एकदम खूष आता मस्त आईबाबा बरोबर छान फिरायचे हवे ते करायचे. पण कोठे फिरायला छान गेलो ! तरी तिथेही नशीब आडवे येतेच. निरोप मागून येतो लगेच ट्रेनिंगसाठी हजर रहा.... झाले सर्व आनंदावर विरजण.

खरंच शिक्षकांचा पगार दिसतो हो लोकांना...पण खरं सांगायचं म्हणजे सुट्टी लागली की, पालकांना डोकेदुखी वाटते, कधी कधी.मुले दिवसभर त्रास देतात... तेव्हा त्यांना कळते खरंच शिक्षक एवढी मूले शाळेत कशी सांभाळत असतील?

शिक्षक हे मेणबत्ती सारखे असतात. जे स्वतः जळून विद्यार्थ्यांचे आयुष्य प्रकाशमान करत असतात.

राष्ट्रीय काम असुद्यात किंवा जनगणना, इलेक्शन ड्युटी,अगदी कोरोना काळातही रस्तयावर उभे राहून चेक पोस्ट सारखे कामही दिवस-रात्र इमाने इतबारे करणारे हे गुरुजन पाहिले की माझ्यासारख्या गृहिणीला वाटायचं खरंच एक कडक सॅल्युट मारावा... कोरोना काळात शाळा बंद असताना सुद्धा ना ? आमच्या यांच्याकडे पाहिले ना,तर कधी सुद्धा मला वाटले नाही की, खरंच शाळा बंद असतील.....बघेल त्या वेळेस हे ऑनलाईन तास घेत असलेले दिसायचे....तर कधी अभ्यास ऑनलाईन तपासत असायचे..

अहो काय सांगू ?चहाचा कप सुद्धा जसाच्या तसा असायचा टिपॉयवर... बर झालं बाई ती शाळा एकदाची सुरु झाली...

विद्यार्थ्यांचे नुकसान होतेय असे सारखे म्हणायचे, तर कधी घरी जाऊन अभ्यास घ्यायचे. शासनाचा तर किती विश्वास गुरूजनांवर एखादे काम येऊद्याच दिलेच शिक्षकांकडे.



सौ. सीमा मंगरुळे
संपर्क क्र. 9075074994

अहो! त्यांच्या सारखा प्रामाणिक शोधूनही सापडणार नाही आणि प्रत्येक काम वेळेतच.... अहो घड्याळाच्या काट्यावरच काम ना?

पडेल ते काम करणारे शिक्षक खरंच हं!...मला ना कधी कधी यांचा खूप अभिमान वाटतो हो. यांच्या बरोबर कोठे बाहेर गेले ना? की तेथे कोणी ना कोणी यांचा विद्यार्थी हा भेटतोच आणि ओळखले का मला सर? म्हणणारा ...आणि तो गुरू शिष्यांच्या चेहरा वरचा आनंद !......

अगदी कॅमेरा ही फिक्का पडेल !

आपले गुरुजण दिसताच,हे आमचे गुरुजी ,सर म्हणताच छाती अभिमानाने फुलून जाते.... शाळेतून घरी आल्यानंतर सुध्दा आमच्या यांच्या चेहऱ्यावर एक प्रकारचे समाधान दिसते....आजचा दिवस सार्थकी लागल्याचे....

हेच समाधान लहान मुलांच्यात रमताना वाटते.... म्हणून कधी घरी राहिले तरी शाळेत कधी. जातोय असं यांना होत हो!

ग्रेट जॉबना, समाधान देणारा.....!

असे हे देशाचे आधारस्तंभ .....

आणि आदर्श नागरिक घडविणारे..

आणिअनेक विद्यार्थ्यांना घडविणारे हे गुरूजन..... खरेच!

गुरुविण न मिळे ज्ञान
ज्ञानाविणा जगी ना सन्मान
जीवन भवसागर तारांया
चला वंदू गुरुराया

# गणेशोत्सव काळात उभारली वृक्षांची चळवळ !

## वसुंधरा प्रतिष्ठानच्या पुढाकाराने 2772 झाडांची लागवड; गणेश मंडळांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** 'वृक्षोत्सव हाच खरा गणेशोत्सव' या विशेष मोहीम अंतर्गत लातूरच्या वसुंधरा प्रतिष्ठानने जिल्हाभरातील अनेक गणेश मंडळांना सोबत घेऊन वृक्षांची चळवळ उभी केली आहे. या गणेशोत्सव काळात आजवर 8 ते 10 फूट उंचीच्या 2772 पर्यावरण पूरक झाडांची लागवड करण्यात आली असून, गणेश मंडळांनी वृक्ष लागवड अन संवर्धनासाठी पुढाकार घेतला आहे. शिवाय, वसुंधरा प्रतिष्ठानने लातुरातील राजीव गांधी चौक परिसरात झाडाचा गणपती साकारून महाराष्ट्र राज्याचे लक्ष पर्यावरण संरक्षणकडे वेधले आहे. या गणेशोत्सव काळात वृक्ष लागवडीने तरुणांमध्ये उत्साह निर्माण केला आहे.
लातूर जिल्ह्यात वनांचे श्रेत्र कमी असल्याने अनेक समस्यांना सामोरे जावे लागले. 2016 साली अक्षरशः रेल्वेने पाणी आणण्याची दुर्दैवी वेळ लातूरवर आली. काळाची गरज ओळखून वसुंधरा प्रतिष्ठान ही सामाजिक संस्था गत आठ वर्षांपासून लातूर शहरासह संपूर्ण जिल्ह्यात वृक्ष लागवड, संवर्धन आणि जनजागृतीचे काम करते आहे. झाडाचा गणपती, ट्री बँक, झाडांचा वाढदिवस, घर तिथं वृक्ष अभियान, झाडांसोबत मैत्री दिवस, सेल्फी विथ ट्री असे अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेत वृक्षांचे महत्त्व मनामनात रुजविण्याचे काम प्रतिष्ठानने केले आहे.
गणेशोत्सव काळात जिल्ह्यातील अनेक मंडळांना सोबत घेऊन वृक्षांची चळवळ गावागावात नेण्यात आली. या गणेशोत्सव काळात निलंगा तालुक्यातील तगरखेडा, औसा तालुक्यातील आलमला, हासेगाव येथील सेवालय, चाकूर तालुक्यातील आष्टा, लातूर तालुक्यातील खाडगाव, खंडापूर, हरंगुळ, यासह लातूर शहरातील अनेक गणेश मंडळांना सोबत घेऊन 8 ते 10 फूट उंचीची वड, पिंपळ, वड, कडुनिंब, आकाश मोगरा, मोहगणी, बेल, करंज, आंबा, चिकू, पेरू आदी 2 हजार 772 झाडांची लागवड करण्यात आली. शिवाय, गावागावात जाऊन वृक्ष लागवड आणि संवर्धनाचे महत्त्व पटवून देण्यात आले. उपक्रमांच्या यशस्वी आयोजनासाठी वसुंधरा परिवारातील सदस्य, गणेश मंडळांचे सर्व पदाधिकारी, युवक, ज्येष्ठ नागरिक, महिला यांनी पुढाकार घेतला.

**झाडे जगवा हाच आमचा खरा सन्मान असेल : प्रा.योगेश शर्मा**

गणेशोत्सव काळात वसुंधरा प्रतिष्ठानने वृक्षांची चळवळ उभा करण्यात आली. या माध्यमातून अनेक गणेश मंडळांना सोबत घेऊन वृक्ष लागवड उपक्रम राबविण्यात आले. यात तरुणांचा समावेश मोठ्या प्रमाणावर आहे. गावात वृक्ष लागवड सोबतच वृक्षांचे महत्त्वही पटवून देण्यात आले. भावी पिढीला सुरक्षित ठेवायचे असेल तर प्रत्येकाने झाडे लावून जगवायला हवीत यासाठी जनजागृती करण्यात आली. गावात वृक्षारोपण साठी गेल्यानंतर तेथील मंडळांच्या वतीने वसुंधरा टीमचा सन्मान होत आहे. या सत्काराला उत्तर देताना प्रा. योगेश शर्मा यांनी झाडांना जगवा हाच आमचा खरा सन्मान असेल, असे सांगितले. यावेळी सर्वांनी टाळ्यांचा प्रतिसाद देत आम्ही सर्वच्या सर्व झाडे जगवू, असे आश्वाशीत केले.

**6 ते 10 फूट उंचीच्या 2772 झाडांची लागवड**

दहा दिवसांत अनेक ठिकाणी वृक्षारोपण उपक्रम असल्याने वसुंधरा प्रतिष्ठानने आपल्या सदस्यांना गावे वाटून देऊन कामाला सुरुवात केली. प्रत्येक गावात आणि लातूर शहरात ज्या ठिकाणी वृक्षारोपण केले तिथे युवकांचा प्रचंड प्रमाणात प्रतिसाद मिळाला. प्रत्येकजण हिरिरीने यात सहभागी झाला. कोणी झाडे उचलत होते, कोणी खड्डे करत होते तर कोणी झाडांना आळा करण्याचे काम या माध्यमातून केले. वृक्षांची चळवळ ही लोकचळवळ व्हावी यासाठी विविध सण आणि उत्सवाच्या माध्यमातून वसुंधरा प्रतिष्ठान जनसामान्यांना सोबत घेऊन कार्य करीत आहेत. गणेशोत्सव काळात आजवर 2 हजार 772 झाडांची लागवड करण्यात आली असून, १०० टक्के झाड जगातील याची खात्री आहे.






# बळीराजाचा खरा मित्र



योगेश बळवंता कोंडके
संपर्क क्र. 7798666931

आधुनिक केसरी

**शेतकऱ्याच्या मनातील वेदना जाणून घेणारा एकमेव जीव म्हणजे त्याची बैलजोडी, आज आपला देश कृषीप्रधान आहे आणि अस म्हणतात की आपल्या देशाची अर्थव्यवस्था ही शेतीवर अवलंबून आहे आणि याच शेतीत जसा शेतकरी राजा राब-राब राबतो आणि आपल्या रक्ताच पाणी करून शेतातून अन्नधान्य पिकवून संपूर्ण देशाला अन्न पुरवत असतो आणि शेतकऱ्यावर जो कर्जाचा डोंगर असतो तो कमी व्हावा म्हणून तो दिवस रात्र शेतीत कष्ट करत असतो**

हे कष्ट करत असताना यात सर्वात मोठी मदत शेतकऱ्याला त्याची बैलजोडी करत असते. त्या बैलांना आपल्या मालकाच्या सर्व वेदना कळतात, सर्व दुःख कळत असते, त्यांना दिसत असते की आपल्या मालकावर किती संकट असतात आणि आपल्या मालकाच संपूर्ण कर्ज कमी व्हाव आणि आपला मालक सुखी समृद्ध व्हावा अस त्या मुक्या जीवाला वाटत असते.शेतकरी आणि त्याची बैलजोडी हे खऱ्या अर्थाने एकजीव झालेले असतात आणि समोर आलेल्या संकटांना धैर्याने सामोर जाण्याची धमक त्यांच्यात आलेली असते. खर तर बैलजोडी शिवाय शेती होणे शक्यच नाही. आपण आजच्या आधुनिक युगात जरी जगत असलो आणि कितीही नवीन तंत्रज्ञान विकसित झालेल असल तरी आज बैलांची कमतरता हि भासतच असते. शेतकऱ्यांच्या विकासात मोलाचा वाटा म्हणजे बैलांचाच असतो कारण बैलांमुळे शेतकऱ्यांची खूप आर्थिक बचत होते. म्हणून म्हणावेसे वाटते की

**शेतकऱ्याचा जीव तु**
**शेतकऱ्याचा आहे प्राण**
**तुझ्याचमुळे आहे आज**

**शेतकऱ्याचं हिरवं रान**

असा शेतकऱ्यांचा आणि बैलाचा सण म्हणजे बैलपोळा असतो हा सण वर्षातून एकदा श्रावण महिन्याच्या शेवटच्या दिवशी असतो. या सणाला शेतकरी मोठ्या उत्साहाने साजरा करतात आणि हा सण तीन दिवस चालणारा असतो. या तीन दिवसांसाठी बैलजोडी हे नवरदेव झालेले असतात आणि नवरी असते जु (जे की बैलांच्या खांद्यावर वर्षभर आपण वखरणी नांगरणी साठी वापरत असतो ते.) पहिल्या दिवशी हळद असते म्हणजे खांदेमळणी. या दिवशी संध्याकाळी बैलांची पुजा करून त्यांना नैवेद्य दाखवला जातो आणि त्यांची खांदेमळणी करण्यात येते, दुसऱ्या दिवशी त्यांना अंघोळ घालून साज चढवला जातो आणि गावातील सर्व बैलांना एकत्र करून गावच्या वेशीतून त्यांची वाजतगाजत मिरवणूक काढण्यात येते आणि पूजा करण्यात येते. हा दिवस म्हणजे पोळा असतो.आणि तिसऱ्या दिवशी पाडवा असतो या दिवशी बैलांना गावातील ग्रामदैवताच्या दर्शनासाठी नेले जाते आणि तीनही दिवस बैलांना पूर्ण आराम दिला जातो. अशाप्रकारे बळीराजाचा हा सण संपूर्ण महाराष्ट्रात वेगवेगळ्या पद्धतीने आणि मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.



# शिक्षक



कविता चव्हाण
संपर्क क्र. 9370062031

आधुनिक केसरी

**लहानपणी शाळेत असतानाचे दिवस आठवतात तेव्हा ते शिक्षक़ आपल्याला शिक्षा करायचे तेव्हा खूप राग यायचा त्यांचा पण ते आपल्याला चांगले शिक्षण मिळावे, आपण आपल्या पायावर उभ राहवं म्हणून धडपड करत त्यानी दिलेल्या शिक्षणामुळे आपण आज इथपर्यंत पोहचु शकलो शाळेत असताना ते गुरूजी नेहमी सांगायचे अभ्यास करा, पण काहिनी तेव्हा त्यांच ऐकल नाही त्याचा आज त्यांना खूप खूप पच्छाताप होतो.**

५ सप्टेंबरला डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस असतो. डॉ. सर्वपल्ली हे भारताचे पाहिले उपराष्ट्रपती आणि दुसरे राष्ट्रपती होते. त्यांनी मद्रासमधील प्रेसिडेंट कॉलेजचे अध्यापक म्हणून काम पाहिले आणि पुढे जाऊंन मैसूर विश्व विद्यालयामध्ये प्रोफेसर झाले. त्यांनी विश्वविद्यालयामध्ये शिक्षकाचे काम पाहिले म्हणून आज त्याचा जन्मदिवस म्हणून शिक्षक दिवस प्रत्येक शाळा, कॉलेज मध्ये साजरा केल जातो. आजच्या दिवशी कॉलेज असो किंवा इंग्लिश मेडियममधील अगदी चौथी, पांचवीची मूल शिक्षक बनून शिकवतात एक दिवस का होइना त्यांना शिकवण्याची संधी मिळते. पूर्वीचे दिवस आताही आपण विसरलेलो नाही. लहान मुली सकाळीच साड्या घालून हातात पुस्तक, खडू, टस्टर घेऊन जाताना दिसायच्या.मूलही अगदी तसेच सर बनून जायचे. शिकवता येत नसलं तरी मुलांची होस तरी फिटते. यातच पालकांचा आनंद असतो. आधी तास घेऊन झाल की दुपारून डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या फोटोला हार घालून भाषण दिले जाते. लहान मुलंही अगदी तोडक्या मोडक्या आवाजात दोन शब्द का होइना बोलतात. आताचा शिक्षक दिवसी लहान मूलं-मुली तेवढे



भाग घेताना दिसत नाहीत.आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात शिक्षक हे असलेच पाहिजेत. कारण चांगल काय, वाईट काय तेच आपल्याला सांगतात. लहानपणी शाळेत असतानाचे दिवस आठवतात. तेव्हा ते शिक्षक़ आपल्याला शिक्षा करायचे तेव्हा खूप राग यायचा त्यांचा. पण ते आपल्याला चांगले शिक्षण मिळावे, आपण आपल्या पायावर उभ राहवं म्हणून धडपड करत. त्यानी दिलेल्या शिक्षणामुळे आपण आज इथपर्यंत पोहचु शकलो. शाळेत असताना ते गुरूजी नेहमी सांगायचे अभ्यास करा, पण काहिनी तेव्हा त्यांच ऐकल नाही. त्याचा आज त्यांना खूप खूप पच्छाताप होतो. आता असं वाटतं त्या व्यक्तींना की तेव्हा अभ्यास केला असता, शिकलो असतो तर आज चांगली नोकरी तरी करू शकलो असतो. आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात आपल्याला प्रत्येक वळणावर प्रत्येक व्यक्ति काहीं न काहीं शिकवुन जाते. आपले पाहिले शिक्षक आपले आईवडील, आपले गुरु, नंतर मित्र, मैत्रिणी, भाऊ, बहिण, नातेवाईक अश्या बऱ्याच व्यक्ती आपल्यापरीन आपल्याला काहीं न काहीं उपदेश देऊन जातात...

# श्री गणेशाच्या षोडशोपचार पूजेचा अर्थ



डॉ. हरिहर कुंभोजकर
संपर्क क्र. 9834336547

आधुनिक केसरी

**श्रीगणरायाचे घरोघरी आगमन झाले आहे. सार्वजनिक गणेशोत्सवही धुमधडाक्यात सुरू आहेत. त्याच वेळी "या उत्सवाला आता हिडीस स्वरूप आलं आहे. आमच्यावेळी असं नव्हतं" अशी कुजबुजही 'बुजुर्गां'च्यात होताना ऐकू येत आहे. गोष्ट खरीच आहे. पण याला आम्हीही कितपत जबाबदार आहोत हे तपासण्याची वेळ आली आहे. हिंदुधर्मात धर्मसुधारणांची प्रदीर्घ परंपरा आहे. त्यामुळे आमच्या धर्मातील कित्येक अनिष्ट रुढी आम्ही दूर करू शकलो. पण अनिष्ट प्रथांवर प्रहार करताना काही घाव आमच्या संस्कृतीच्या मुळावरही बसले आहेत. अन्य धर्मियांना आमच्यात केवळ दोषच दिसले तर समजण्यासारखे आहे. पण आम्हीही आमच्या पुढच्या पिढीला आपल्या संस्कृतीतील दोषच सांगितले आहेत. आपल्या संपन्न अध्यात्मिक वारश्याबद्दल तिला काही ठाऊकच नाही.**

देव आणि भक्त यांच्यातील नाते त्यापैकी एक आहे. पूजा-विधीतील काव्य नव्या पिढीला ठाऊक नाही. ठाऊक आहेत केवळ उपचार. ज्ञानी व्यक्तीसाठी सर्वच गोष्टी उपचार असतात. पण हा उपचारही कशाचे तरी प्रतीक असतो. तो नकळत काही संस्कार करत असतो. 'घर घर तिरंगा' तरी कशासाठी असतो? सामान्य माणूस श्रद्धाळू असतो. पण श्रद्धेमागचा विचार त्याला समजावून सांगावा लागतो. प्रतीकांचा अर्थ त्याला स्पष्ट करावा लागतो. अन्यथा आर्थिक संपन्नता येऊनही तो वैचारिकदृष्ट्या कंगालच राहतो. पूजेमागेही विचार आहे. त्यातही काही प्रतीकात्मकता आहे. तो विचार समजला तर पूजेतून समाधान मिळते. त्या प्रतीकांचा अर्थ कळला तर मनावर काही संस्कार होतात. त्याचे मानसिक उन्नयन होते. आपले देवाशी प्रेमाचे नाते असते. पूजा त्या प्रेमाची अभिव्यक्ती असते.

ज्यू, ईसाई आणि इस्लाम या धर्मातील ईश्वर 'लॉर्ड' आहे, 'मालिक' आहे. सर्व माणसे त्याची आज्ञाधारक प्रजा आहेत, त्याचे 'बंदे' आहेत. बंदा केवळ अर्ज करू शकतो. दुआ मागू शकतो. प्रार्थना करू शकतो. त्यामुळे मशीद अथवा चर्च हे प्रार्थना-स्थळ असते. पूजा-स्थळ नसते. इंग्रजीत धार्मिक माणसाला "गॉड-फिअरिंग"-देवाला भिणारा म्हणतात. आम्ही त्याला "पापभीरू"- पापाला भिणारा म्हणतो. पण पापाला भिणारा म्हणजे देवाला भिणारा नव्हे. आईने पाठीत धपाटा मारला तरी मूल रडत नाही, पण तिने अबोला धरला तर मात्र त्याला रडू येते. कारण मूल आईला घाबरत नसते, ते तिच्या प्रेमाचे भुकेले असते. आणि ते प्रेम चांगले वागण्याने मिळत असते. भक्त आणि देव यांचे प्रेमाचे नाते असते. कृष्ण यशोदेचा पुत्र असतो. दौपदीचा तो बंधू असतो. मीरेचा तो पती असतो. नाथाच्याघरी तो पाणी भरतो, चोखोबांची गुरे राखतो, जनाईचे दळण दळतो, कबीराचे शेले विणतो. कारण "त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव". पैलतीरी कोकत असणारा काऊ "पाहुणे पंढरीराऊ घरास येती" असा निरोप, ज्ञानेश्वरांसाठी, घेऊन येतो. श्रावण-भाद्रपदात खेडेगावातून, म्हटली जाणारी लोकगीते ऐकाः "गौराई आमची बाळाई, सकरुबा आमचा जावई". श्रवणात गौर आमच्या घरी माहेरपणाला येते. शंकर जावई असतो. गणपती आजोळी येतो. गणपतीबाप्पाला निरोप देताना "पुढच्या वर्षी लवकर या" अशी कौतुकाची मागणी असते. हिंदू व्यक्तीच्या घरात मंगलकार्य असेल तर त्याची निमंत्रण-पत्रिका प्रथम देवापुढे ठेऊन देवाला कार्याला येण्याचे निमंत्रण दिले जाते. देव हा आमचा आवडता नातलग. पूजा म्हणजे पाहुणचार. षोडशोपचार पूजेत सोळा उपचार आहेत. ते सर्व पाहुणचाराशी संबंधित आहे. ते सोळा उपचार असे आहेत.

**१. आवाहन :** पूजेची सुरवात इष्ट देवतेला आवाहन करून केली जाते. त्यालाच मूर्तींची प्राण-प्रतिष्ठा म्हणतात. आवाहन म्हणजे आमंत्रण. आवाहनाचा मंत्र म्हणण्यापूर्वी मूर्तीत देवत्व नसते. आवाहनात देवाला, त्याने मूर्तीत प्रवेश करावा अशी आपण विनंती करतो. हे पाहुण्याला "यावे, यावे" असे म्हणून स्वागत करण्यासारखे आहे. आवाहना नंतर त्या मूर्तीत देवत्व येते.

**२. आसन :** बोलावलेल्या पाहुण्याला आसन दिले जाते. देवाला पाटावर, चौरंगावर ठेवतात.

३. पाद्य म्हणजे पाय धुणे. खास पाहुण्याचे पाय यजमान स्वतः धूत असतात. मातीच्या मूर्तीच्या पायावर फुलाने पाणी शिंपडले जाते. धातूच्या मूर्तीचे पाय ओल्या वस्त्राने पुसतात. डोक्यावर मूर्ती घेऊन येणाऱ्या व्यक्तीच्या पायावर पाणी घालतात त्यामागची भावनाही तीच आहे.

४.अर्घ्य देण्याची क्रिया करताना दोन्ही हाताच्या ओंजळीत पाणी घेऊन हळू हळू खाली सोडले जाते. या पाण्यात देव आपले हात धुतो अशी भावना असते.

**५. आचमन :** आचमन-क्रिया करताना पळीतून डाव्या हाताने उजव्या हाताच्या ओंजळीत पाणी घेऊन तोंडात टाकायचे असते. पाहुणा आल्यावर प्रथम त्याला प्यायला पाणी देण्याची पद्धत आहे. आचमन सांकेतिक रीतीने तेच सुचविते.

**६. स्नान :** आचमनानन्तर मूर्तीला स्नान घातले जाते. शाडूच्या



मूर्तीवर फुलांनी पाणी शिंपडतात. ही पाहुण्याच्या अंघोळीची व्यवस्था झाली.

**७. वस्त्रोपवस्त्र :** स्नानानंतर देवाला वस्त्र नेसवले जाते. उपवीत (जानवे) हे वस्त्राचे प्रतीक मानले आहे.

**८. गंधविलेपन :** स्नानानंतर अंगाला चंदनाचा लेप देण्याची पद्धत आपल्या उष्ण देशात्त पूर्वी होती. आता टाल्कम पावडर वापरतात. देवाला गंध लावण्यामागची भावना तीच आहे.

९. फुले/अलंकार देवाला अर्पण करणे हे पाहुण्यांना भेट वस्तू देण्याचे प्रतीक आहे. भेटीचे मूल्य तिच्या किमतीत नसते. तुळशीचे पान प्रेमपूर्वक दिले तरी देव ते आनंदाने स्वीकारतो. भागवतात एक हृद्य कथा आहे. श्रीकृष्णाची सुवर्णतुला करायची होती. सोन्याच्या द्वारकेत राहणाऱ्या सर्व स्त्रियांनी आपले सर्व सोने तराजूत टाकले तरी श्रीकृष्णाचे पारडे वर जाईना. अख्खा गोवर्धनपर्वत एका किरंगळीने उचलणाऱ्या कृष्णाची तुळा जगातले सर्व सोने पारड्यात टाकले तरी होणार नव्हती. रुक्मिणीने त्या पारड्यात एक तुळशीपत्र प्रेमपूर्वक ठेवले आणि कृष्णाचे पारडे वर गेले. "अवघ्या तुळसीदळाने गिरिधर हरि तुळिला". कारण ते तुळशीपत्र साधे नव्हते. ते अपार प्रेमाने भारलेले होते.

१०. धूप वातावरण सुगंधित करण्यासाटी असतो.

११. दीप प्रज्वलन हा सजावटीचा, उत्सवाचा भाग आहे. अन्य संस्कृतीतही पाहुण्याचे स्वागत दीप-प्रज्वलनाने करण्याची पद्धत आहे.

१२. नैवेद्यः नैवेद्य म्हणजे भोजन देणे. नैवेद्य दाखवण्याची क्रिया ही घास भरविण्याची क्रिया आहे.

१३. तांबूलः जेवणानंतर विडा देणे हा आपल्या शिष्टाचाराचा भाग आहे. त्याचे प्रतीक म्हणून देवापुढे आपण पानसुपारी ठेवतो.

१४. आरती करण्यात पाहुण्यासंबंधी आदरभाव व्यक्त होतो

१५. प्रदक्षिणाः स्तोत्र म्हणत (स्वतः भोवती) फिरणे, हे पाहुण्यासंबंधीचा आनंद व्यक्त करण्याचे प्रतीक आहे.

१६. विसर्जन म्हणजे निरोप देणे. विसर्जनाचे वेळी "पुढच्या वर्षी लवकर या " असे म्हटले जाते.

पूजा अध्यात्मिक विचारांची पहिली पायरी आहे. ती अध्यात्मातली Nudge Theory आहे. ती आपल्याला ईश्वराशी आपल्या नात्याचे स्मरण करून देते. सर्वेपल्ली राधाकृष्णन म्हणतातः "The characteristic genius of the Indian mind is not to shake the beliefs of the common man but to lead them by stages to the understanding of the deeper philosophical meaning behind their beliefs". परमेश्वर विश्वरूप आहे. गणपति-अथर्वशीर्षात त्याचे वर्णन आहे. तो भक्तासाठी साकार होतो. साऱ्या विश्वाशीच आपले नाते असते. यासाठी 'पाहुणे पंढरीराउ'ची वाट पाहणारे ज्ञानेश्वर महाराज म्हणतात

हे विश्वाचि माझे घर | ऐसी मती जायची स्थिर ।।
किंबहुना चराचर ।आपणचि जाला ।।

चराचराशी एकरूप होणे ही अध्यात्माची शेवटची पायरी आहे. परमेश्वर असेल किंवा नसेल. गणेशोत्सवाचे पावित्र्य जपायचे ते परमेश्वराची संकल्पना भ्रष्ट होऊ नये म्हणून नव्हे, तर चराचराशी नाते जोडणारी ही सुंदर, भव्योदात्त संस्कृती नष्ट होऊ नये म्हणून.

# जागतिक मंदीतही भारतीय अर्थव्यवस्थेची आगेकूच सुरुच



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**जागतिक मंदीच्या संकटात देखील भारतीय अर्थव्यवस्था मजबूत होत आहे. मंदितही भारतीय अर्थव्यवस्था सतत मजबूत होण्याचा परिणाम दिसून येत आहे. युरोपमधील मंदीच्या काळात देशांतर्गत अर्थव्यवस्थेच्या वेगवान वाढीसोबतच भारत टॉप ५ अर्थव्यवस्थेत सामील झाला आहे. इतकेच नाही तर भारताने सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये असलेल्या ब्रिटनला मागे टाकले असून ब्रिटन आता सहाव्या स्थानावर घसरला आहे.**

ब्लूमबर्गच्या अहवालानुसार अमेरिकी डॉलरमध्ये केलेल्या गणनेनुसार २०२१ च्या शेवटच्या तिमाहीत भारताने इंग्लंडला मागे टाकले आहे. दुसरीकडे IMF च्या जीडीपी डेटानुसार भारताने २०२२ च्या पहिल्या तिमाहीत आपली वाढ मजबूत केली आहे. अंदाजानुसार, या वाढीसह भारत लवकरच वार्षिक आधारावर जगातील ५वी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनू शकेल.

भारताची अर्थव्यवस्था ब्रिटनपेक्षा किती मोठी

मार्च तिमाहीच्या अखेरीस IMF आणि डॉलर विनिमय दराने जारी केलेल्या आकडेवारीच्या आधारे ब्लूमबर्गने माहिती दिली आहे की नाममात्र रोखीत भारताच्या अर्थव्यवस्थेचा आकार ८५४.७ अब्ज डॉलर होता. तर याच कालावधीत त्याच आधारावर इंग्लंडच्या अर्थव्यवस्थेचा आकार ८१६ अब्ज डॉलर होता. तसेच आगामी काळात भारत ब्रिटिश अर्थव्यवस्थेविरुद्ध आपली धार मजबूत करेल असा अंदाज वर्तवला जात आहे.

दरम्यान एकीकडे चालू आर्थिक वर्षात भारतासाठी विकासाचा अंदाज ७ टक्के ठेवण्यात आला आहे, जी जगातील सर्व प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये सर्वात वेगवान आहे. दुसरीकडे, इंग्लंडच्या अर्थव्यवस्थेत मंदी येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. हे पाहता, भारत वार्षिक आधारावर डॉलरच्या मूल्यामध्ये इंग्लंडला मागे टाकून पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनेल, असा अंदाज IMF ने व्यक्त केला आहे.

२० वर्षात १० पटीने जीडीपीत वाढ

वार्षिक आधारावर भारताची अर्थव्यवस्था ३१.७ ट्रिलियन डॉलरची आहे आणि इंग्लंडच्या मागे सहाव्या क्रमांकावर आहे. इंग्लंडचा जीडीपी सध्या ३.१९ ट्रिलियन डॉलर आहे. तर ७ टक्क्यांच्या अंदाजे वाढीसह भारत या वर्षीही वार्षिक आधारावर यूकेला मागे टाकण्याची शक्यता आहे. सध्या अमेरिका ही जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे त्यानंतर चीन, जपान आणि जर्मनीचा क्रमांक लागतो. भारताच्या जीडीपीने गेल्या २० वर्षांत १० पट वाढ नोंदवली आहे.

इंग्लंडची परिस्थिती

आंतरराष्ट्रीय क्रमवारीत ब्रिटनची ही घसरण नव्या पंतप्रधानांसाठी आव्हानासारखी आहे. कंझर्व्हेटिव्ह पक्षाचे सदस्य बोरिस जॉन्सन यांचा उत्तराधिकारी निवडतील. परराष्ट्र मंत्री लिझ ट्रुज या शर्यतीत भारतीय



वंशाचे मंत्री ऋषी सुनक यांना मागे टाकण्याची शक्यता आहे. तसेच या शर्यतीतील विजेते चार दशकांतील तीव्र चलनवाढ आणि मंदीच्या वाढत्या धोक्याचा सामना करणाऱ्या देशाची कमान हाती घेतील. याशिवाय बँक ऑफ इंग्लंडचा इशारा या प्रकरणी चिंता वाढवत आहे, ज्यामध्ये म्हटले की ही स्थिती २०२४ पर्यंत सुरू राहू शकते.

2014 मध्ये भारताचे सकल राष्ट्रीय उत्पादन (GDP) 2,6 टक्के होते. त्या तुलनेत आता हा दर 3.5 टक्के आहे आणि 2027 मध्ये तो 4 टक्क्यांच्या पुढे जाण्याची शक्यता असल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे. सध्या जर्मनीचा जीडीपी 4 टक्के आहे. एसबीआयने दिलेल्या शोधनिबंधात याची माहिती देण्यात आली आहे. 2014 पासून भारताने आगेकूच सुरु केली आहे. विविध स्तरावरील उपाय योजना आणि नवनवीन वाटा चोखंदळत भारताने विकास दर वाढवण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. जागतिक अर्थव्यवस्थेत 2014 मध्ये भारताचे 10वे स्थान होते. त्यानंतर भारतीय अर्थव्यवस्थेने सातव्या स्थानी झेप घेतली. गेल्या वर्षी 2021, डिसेंबर महिन्यात पहिल्यांदा भारताने इंग्लंडला धोबीपछाड देत पाचव्या स्थानी झेप घेतली. त्यात सातत्य दिसून आले. आज भारतीय अर्थव्यवस्थेच्या 5 व्या मानांकनावर शिक्कामोर्तब झाले आहे. हा प्रवास खडतर असला तरी झपाटल्यागत झाला आहे. आता हा झंझावत पुढे जाईल आणि 2029 मध्ये भारतीय अर्थव्यवस्था तिसरी मोठी अर्थव्यवस्था असेल असा अंदाज एसबीआयने शोधनिंबधात मांडला आहे. सध्याच्या वाढीच्या दराने भारताने 2027 मध्ये जर्मनीला आणि बहुधा 2029 पर्यंत जपानला मागे टाकण्याची शक्यता त्यात वर्तवण्यात आली आहे.

# माणुसकीचा हृद सोहळा- कलाश्रम



आशिष निनगुरकर
मोबा. 9022879904

आधुनिक केसरी

**कलाश्रम ही अशी एक संस्था आहे, जी कलावंतांसाठी झटणारी संस्था आहे.मनातल्या भावनांचे सौंदर्यपूर्वक केलेले वर्णन म्हणजे 'कला' असते.ही कला वेगवेगळ्या माध्यमातून आपल्या भेटीला येत असते.कधी शब्दांच्या रुपात तर कधी चित्रांच्या रुपात...कधी अभिनयातून तर कधी भाषणातून...**

अशा विविध रुपांमधून कला आपल्याला भेटत असते. प्रत्येकामध्ये काही ना काही कलागुण असतात.त्या कलागुणांना व्यासपीठ मिळणे गरजेचे असते,तसेच त्यांचा योग्य सन्मान करत त्यांना योग्य ते मार्गदर्शन करणे गरजेचे असते,अशा तळागाळातील लोकांच्या कलेची पारख करून त्यांना व्यासपीठ देऊन निस्वार्थी भावनेने अस्सल कलावंतांचा 'दखलपात्र' पुरस्कार देऊन सन्मान करणारी संस्था म्हणजे 'कलाश्रम'..

या कलाश्रम संस्थेचा नुकताच 49 वा कार्यक्रम संपन्न झाला.या कार्यक्रमाचा मी साक्षीदार होतो.सुबक नियोजन,नेटके व्यासपीठ व भावलेली कलाकारांची मांदियाळी यातून हा माणुसकीचा हृद सोहळा असल्याचे लक्षात आले.हा कार्यक्रम सहजसुंदर आणि घरघुती असल्याने जास्त भावला.या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या अभिनेत्री चिन्मयी सुमित होत्या.त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला वेगळा रंग आला.'कलाश्रम' या संस्थेचे संस्थापक नंदकुमार पाटील यांनी जेव्हा या कार्यक्रमात मला कविता सादर करण्यासाठी बोलवले तेव्हा मी तात्काळ होकार दिला.त्यासाठी दोन कारणे होते...एकतर 'कलाश्रम' चा प्रवास मी गेल्या अनेक महिन्यांपासून बघत आहे आणि दुसरे कविवर्य नारायण सुर्वे यांचा स्मृतिदिन...कलाश्रमचा प्रत्येक कार्यक्रम वेगळा आणि हटके असतो.अनेक कल्पक स्पर्धा घेऊन त्यांनी कलेचा जिवंतपणा योग्य त्या पद्धतीने निवडून कलाकाराला योग्य ते बक्षीस व व्यासपीठ दिले आहे.. त्यामुळे मला ही संधी सोडायची नव्हती.त्यात मराठी शाळा टिकावी यासाठी झटणाऱ्या व दिग्गज अभिनेत्री चिन्मयी सुमित यांची उपस्थिती असणार होती,त्यामुळे हा हृद सोहळा भावपूर्ण होता.

कलाश्रमचा 'अभियान सन्मान' कार्यक्रम म्हणजे दिवंगतांचा आदर आणि गुणीजनांचा कदर असा हा कार्यक्रम असतो. 30 ऑगस्ट रोजी या दिवशी झालेल्या कार्यक्रमांमध्ये जवळजवळ 20 कलाकारांचा प्रत्यक्ष सहभाग होता. कलाश्रमचा हा कार्यक्रम प्रत्येक महिन्याला ठरलेला उपक्रम असतो.

कलाश्रमच्या 'अभियान सन्मान' या कार्यक्रमात ज्या दिवंगतांच्या स्मरणार्थ दखलपत्र दिले होते, त्यांचे कुटुंब सदस्य माजी नगरसेवक सचिन पडवळ, ॲड. सुषमा



कदम, चेतन मंचेकर, डॉ. मेघना तोरसकर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या होत्या. कलाश्रमच्या 'अभियान सन्मान' या उपक्रमात अभिनेत्री, नृत्यांगना, ते चित्रपटगृहाची व्यवस्थापिका म्हणून काम करणाऱ्या मोहिनी पटेल यांना अव्वल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. दिवंगत सामाजिक कार्यकर्त्या मालती कदम यांच्या नावाचा हा पुरस्कार होता. अभिनेत्री चिन्मयी सुमित यांच्या हस्ते तो देण्यात आला.आदर्श गृहिणी दिपिका पालकर, विद्यार्थीप्रिय शिक्षक अरविंद सावंत, सामाजिक कार्यकर्ते प्रवीण फाटक, फणी वादक शशिकांत खानविलकर यांना अभियान सन्मान उपक्रमात दखलपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

'कलाश्रम' या संस्थेच्या वतीने प्रत्येक महिन्याला 'अभियान सन्मान' हा उपक्रम राबवला जातो. स्वातंत्र्यसैनिक डॉ. परशुराम पाटील कला केंद्राच्या अंतर्गत हा कार्यक्रम केला जातो.कलाश्रमचा 'अभियान सन्मान' कार्यक्रम म्हणजे भावना आणि स्मरण यांचा मिलाप असतो. यावेळी कवी, पद्मश्री नारायण सुर्वे यांचा स्मृतिदिन लक्षात घेऊन कवी, लेखक आशिष निनगुरकर यांनी कविवर्य नारायण सुर्वे यांची 'असं पत्रांत लिव्हा' ही कविता सादर करून काव्यात्मक आदरांजली वाहिली. अभिनेत्री चिन्मयी सुमित यांनी आपुलकिने आणि भावनेने साधलेला संवाद उपस्थितीतांना अधिक भावला.असा उत्तरोत्तर रंगलेला सोहळा संपू नये असेच वाटत होते.. या बहारदार कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली नेर यांनी केले.'कलाश्रम'च्या या उपक्रमाला जेवढी दाद द्यावी तेवढी कमीच...'कलाश्रम' साठी झटणाऱ्या सर्व व्यक्तींना मनापासून सलाम आणि पुढील सर्व उपक्रमासाठी आभाळभर शुभेच्छा...

# ताडकळस येथे अखेर खा. संजय जाधव यांच्या सहकार्याने मिळाला डिपी!

आधुनिक केसरी न्यूज

**पुर्णा :** तालुक्यातील ताडकळस येथील हटकर गल्ली येथे गेल्या दोन वर्षांपासून सततच डिपी जळुन नादुरुस्त होत असल्याने येथे राहणाऱ्या ग्रामस्थांना दोन वर्षांपासून विविध सण उत्सव अंधारातच साजरे करावे लागत असुन गेल्या १५ दिवसांपासून डिप्पी नादुरुस्त असल्याने अंधाराचे साम्राज्य निर्माण झाले होते. अखेर खा. संजय जाधव यांनी महावितरणच्या वरिष्ठ अधिकार्यांशी संपर्क करून रविवारी रात्री उशिरा डिप्पी सुरू झाल्याने ऐन गणेश व गौरी उत्सवातील आंधाराचे विघ्न नष्ट झाले.

ताडकळस येथील हटकर गल्ली येथील डिपीवरील मोठ्या प्रमाणात गावांतील घरगुती विद्युत पुरवठा होत असतो. येथील डिपी दर महिन्याला जळुन नादुरुस्त होत असल्याने येथे राहणाऱ्या ग्रामस्थांना अंधार सोबत विविध अडचणींना गेल्या दोन वर्षांपासून तोंड द्यावे लागत आहे.या परिसरातील ग्रामस्थांना दिपावली,पंचमी,पोळा, गणेशोत्सव, नवरात्र अशा सणाच्या दिवसात देखील गेल्या दोन वर्षांपासून विद्युत



पुरवठा खंडित राहत असल्याने अंधाराचे साम्राज्य निर्माण होत आहे.

या गंभीर बाबीकडे गावातील लोकप्रतिनिधी व विद्युत मंडळाच्या वरिष्ठांनी याची दखल घेऊन या परिसरात स्वतंत्र दुसरा डिपी उपलब्ध करून सुरळीत विज पुरवठा सुरू करावा अशी मागणी ताडकळस येथील हटकर गल्लीतील ग्रामस्थांतुन करण्यात आली आहे. गत १५ दिवसांपासून येथील डिप्पी नादुरुस्त असल्याने अंधार झाला होता. सध्या श्री गणेश उत्सवाची धामधूम असुन गौरीचे आगमन देखील झाले आहे. ऐन सणाच्या दिवसातच विद्युत पुरवठा बंद असल्याने या परिसरातील ग्रामस्थांना नाहक त्रास सहन करावा लागत होता. या प्रकरणी ताडकळस येथील शिवसेना शहरप्रमुख दिलीपराव आंबोरे पाटील, उप शहरप्रमुख अनिल नरवटे, दलित आघाडीचे तालुका संघटक सुरेश मगरे यांनी खा. संजय जाधव यांची भेट घेऊन हा प्रकार सांगितला . लगेच महावितरणच्या वरिष्ठ अधिकार्यांशी खा. जाधव यांनी संपर्क करून सध्या गणेश उत्सवासह गौरी आगमन असल्याने ताडकळस येथील हटकर गल्लीतील डिप्पी तात्काळ देण्याची शिफारस केली असता रविवार ४ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता डिप्पी मिळाल्याने रात्री ११ वाजता पंधरा दिवसापासून आंधाराचे विघ्न टळले. हा डिप्पी मिळाल्याने हटकर गल्लीतील ग्रामस्थांतुन खा. संजय जाधव यांचे या गल्लीतील नागरीक आभार असुन सर्व नागरीकात आंनद व्यक्त होत आहेत

# शिक्षकदिनी अय्युब पठाण यांचा सत्कार



आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** जायकवाडी (उत्तर) ता. पैठण येथील शाहू विद्यालयाचे विद्यार्थीप्रिय शिक्षक तथा प्रसिद्ध साहित्यिक अय्युब पठाण लोहगांवकर यांचा दहावीच्या मुलींनी शिक्षक दिना निमीत्ताने गुलाबपुष्प व पेन देऊन अय्युब पठाणसर यांचा यथोचित सत्कार केला.अय्युब पठाण लोहगावकर हे विवकानंद शिक्षण संस्थेत मागील एकोणतीस वर्षापासून पवित्र ज्ञानदान क्षेत्रात अध्यापनाचे कार्य करीत आलेले आहेत. अय्युब पठाण यांचा जीवनप्रवास मोठा कष्ठपद आहे. बँन्डमास्टर ते शाळामास्तर असा त्यांचा जीवन प्रवास झालेला आहे. या खडतर अनुभवांची शिदोरी पठाण हे प्रभावी अध्यापनातून विद्यार्थ्यांना देतात. आज त्यांच्या हाताखाली शिकलेले विद्यार्थी मोठ्या पदावर कार्यरत आहे. हे त्यांच्या अध्यापन कौशल्यातून त्यांनी हे विद्यार्थी घडविलेले आहे.

# डॉ. मानवतकर यांनी विद्यार्थ्यांना वह्या, पेन देऊन साजरा केला वाढदिवस



आधुनिक केसरी न्यूज

**मंठा :** प्रसिद्ध साहित्यिक डॉ. धोंडोपंत मानवतकर यांनी ५ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजता आपला वाढदिवस विद्यार्थ्यांना वह्या, पेन वाटप करून साजरा केला.

जिल्हा परिषद प्रशाला मंठा येथील इयत्ता ५, ६, व ७ वीच्या सर्व विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आपला छोटासा मदतीचा हातभार म्हणून वह्या व पेन देऊन विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणीत केला. ५ सप्टेंबर रोजी डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षकदिन म्हणून साजरी केली जाते, याच दिवशी डॉ. धोंडोपंत मानवतकर यांचाही वाढदिवस एक सुंदर योगायोग होता.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना जिल्हाप्रमुख ए.जे. पाटील बोराडे यांची उपस्थिती होती. श्री बोराडे यांच्या हस्ते डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सर्व उपस्थितांनी अभिवादन केले. यावेळी पत्रकार संतोष दायमा, पत्रकार बालाजी कुलकर्णी व कार्यकर्ते मारोती खनपटे यांची आवर्जून उपस्थिती होती. याप्रसंगी प्रशालेच्या वतीने साहित्यिक डॉ.धोंडोपंत मानवतकर यांचा पुष्पहार, टोपी, रुमाल देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी साहित्यिक डॉ.धोंडोपंत मानवतकर व मुख्याध्यापक श्री नेताजी चौधरी यांनी ज्ञानदानात असणारे शिक्षकाचे महत्व विशद करणारे मनोगत व्यक्त करून सर्व शिक्षकवृदांना शुभेच्छा दिल्या. तद्नंतर डॉ.धोंडोपंत मानवतकर यांच्या हस्ते वह्या, पेन वाटप करण्यात आले. यावेळी जि.प. शाळेचे सन्माननीय मुख्याध्यापक श्री नेताजी चौधरी, श्री आर.एन. चटलोड, श्री शिवाजीराव देशमुख, श्री के.के चव्हाण, श्री संतोष वीरकर, श्री भुजंग सर आदी शिक्षकवृंदांची उपस्थिती होती. या कार्यक्रमात सर्व विद्यार्थ्यांच्या मुखावर अप्रुप व आनंद दिसून येत होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री शिवाजीराव देशमुख यांनी केले तर, संतोष वीरकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# मुख्यालयी राहणाऱ्या शिक्षकांचा गल्ले बोरगावात सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील गल्ले बोरगाव येथे आमदार प्रशांत बंब यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक दिनाचे औचित्य साधून गल्लेबोरगाव मुख्यालय येथे राहणाऱ्या शिक्षकांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला व त्यांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी केवळ तीन शिक्षक मुख्यालय राहत असल्याची माहिती समोर आली आहे.

सोमवार दि.५ रोजी सकाळी गल्ले बोरगाव भाजपा कार्यकर्त्यांच्या वतीने मुख्यालय राहणाऱ्या शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये अंधारमळा वस्ती शाळेचे शिक्षक प्रवीण विनायक ढोणे, राहुल गंगाधर वाघमारे तसेच गल्लेबोरगाव येथील प्राथमिक शाळेवर कार्यरत असलेल्या शिक्षिका कमालताई धोंडीराम गोरे - खोसरे या तीन शिक्षकांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे मा. उपसभापती संतोष राजपूत, उपसरपंच रामदास चंद्रटिके, चेअरमन तुकाराम हारदे, राजेंद्र बढे, मुकेश राजपुत, ग्रामपंचायत सदस्य शेषराव भागवत, राजकुमार शर्मा, एकनाथ खोसरे, शंकर मिसाळ, बाबासाहेब वीर, अक्षय खोसरे, अशोक बढे, राजू भागवत आदी ग्रामस्थांची उपस्थिती होती.



# काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस श्याम उमाळकर यांचा सत्कार


आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** मेहकर येथे "श्री" संत गजानन महाराज सेवा समिती च्या वतीने "श्री" ची पुण्यतिथी व ऋषीपंचमी महोत्सव व महाप्रसाद वितरण कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात सकाळी सात वाजता श्री च्या लघुरुद्र अभिषेक सकाळी दहा वाजता वृक्षारोपन "श्री" चा जप ह.भ.प. देवदत्त पितळे महाराज यांच्या प्रवचन व विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार आयोजित केला होता.

यावेळी लोणार नगरपालिकेचे मा. उपनगराध्यक्ष शेख समद शेख अहमद, ओबीसी सेलचे शहराध्यक्ष अंबादास इंगळे यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस तथा गजानन महाराज संस्थान मेहकर चे अध्यक्ष श्याम उमाळकर यांची अकोला जिल्हा प्रभारीपदी नियुक्ती झाल्याबद्दल व पक्ष संघटन व भविष्यात होऊ घातलेल्या निवडणुकीसाठी त्यांची अकोला जिल्ह्याच्या प्रभारीपदी नियुक्ती झाल्याबद्दल लोणार येथील नगरपरिषदेचे मा.उपनगराध्यक्ष शेख समद यांनी शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन मान सन्मान केला.

यावेळी प्रमुख उपस्थिती ह.भ.प. देवदत्त पितळे महाराज, तात्या कृपाळ, मंदाकिनी कंकाल, जिल्हा व्हॉइस मीडियाचे कार्याध्यक्ष सिद्धेश्वर पवार, साहेबराव सरदार, शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुदेश लोढे, भाई कैलास सुखदाने, पंकज हजारी, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष अनिता रणबावरे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष अलका खंडारे उपस्थित होते. यावेळी सूत्रसंचालन शैलेश बावस्कर यांनी केले तर आभार प्रदर्शन शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष पंकज हजारी यांनी केले. यावेळी माजी नगराध्यक्ष विलास चनखोरे, कलीम खान, इनुस पटेल, रवी सावजी, उपस्थित होते.

# सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

## हनिमून भाग - २

आधुनिक केसरी

६. सूर्योदय किंवा सूर्योस्ताचे निरीक्षण करणे : हा एक एकाग्रतेसाठी असलेला उपाय आहे. यामध्ये नवविवाहित जोडपं एकत्र येऊन त्यांच्यामध्ये एक अनोखं भावनिक नात निर्माण होतं, ते एकमेकांमध्ये भावनांनी गुंतत जातं.

एकमेकांबद्दल ओढ निर्माण होते.

७. फोटोग्राफी : प्रत्येकालाच फोटोची आवड असते. आपला आलेला सुंदर

फोटो आणि दुसऱ्याने केलेली जत्याची प्रशंसा हा अगदी सगळ्यांच्याच आवडीचा भाग . 'सेल्फी' या आत्ताच्या आधुनिक प्रकारामुळे तर ही आवड अजून वाढली आहे. हनिमूनच्या या प्रवासात दररोज न चुकता वेगवेगळ्या ठिकाणी एकमेकांचे किंवा एकत्र असे फोटो काढून रात्री एकांतात ते पाहात पाहात एकरूप होण्याचा आनंद काही वेगळाच....

८. मसाज : मसाजमुळे पूर्ण स्ट्रेस किंवा टेन्शन कमी होते.

SKIN TOSKIN

TOUCH मुळे डोपामीन नावाचे एक हार्मोन तयार होतं. ज्याने उत्तेजना आणि जवळीक अधिक वाढते. मात्र मसाज हा जोडप्यानं एकमेकांचा करायचा आहे रुम-सर्व्हिस - ज्याठिकाणी आपण थांबलो आहोत त्याठिकाणच्या रुमवरच एकाद्यावेळचं जेवण मागवा आणि एकाच प्लेटमध्ये एकमेकांना भरवत मस्त जेवावं. हे करत असताना सोबत एखादं ड्रिंक म्हणजे मॉकटेल किंवा वाईन घेता आली तर त्या जेवणाची रंगत अजूनच वाढते.

हनिमून पॅकिंग

हनिमूनला जाताना काय घ्यावे आणि काय घेऊ नये?

हनिमूनला जात असताना फार जास्त कपडे घेण्याची आवश्यकता नसते. मोजकेच साधारणतः हॅण्डबॅगमध्ये राहतील एवढेच कपडे घ्यावेत. जेणे करुन बॅगा गहाळ होण्यासारखा प्रकार होऊ नये,. उदा. काय घ्यावे ? दोन शूज, २-३ शॉर्ट्स, २ पेअर पॅन्ट, २ ते ३ स्कर्ट्स, ड्रेसेस, २-३ स्विमिंग सुटस्, कवर अपस, ४-५ टी शर्ट्स, २ ब्लाऊज, लिंगरी, हॅटस्, लाईट स्वेटर, नायटी आणि स्वतःचे किट इ. (क्रमशः)

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी ॲण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com

# मटका चालविणाऱ्याला पोलीसांनी घेतले ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील पिशोर पोलिसांनी मटका अड्डयावर छापा मारून एकास ताब्यात घेतले. अशोक मोकासे (रा. दीगर पिशोर ता. कन्नड) हा चहा दुकानाजवळ श्रीदेवी नावाचा मटका पिढी चालवत असुन हा जुगार पैशावर खेळताना व खेळविताना पिशोर पोलिसांना माहिती मिळताच सपोनि कोमल शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली बिट जमादार किरण गंडे यांनी सापळा रचून आरोपीला ताब्यात घेऊन २१२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला व सदर कारवाई सपोनि कोमल शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली बिट जमादार किरण गंडे, पि.सी. अन्सार पटेल यांनी केली आहे व गावातील नागरिकांना मटक्याची चटक लावणाऱ्या दोषींवर कडक कारवाई करावी, अशी गावातील प्रतिष्ठित नागरिकांची मागणीही होत आहे.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in